दैनिक

# हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com | Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358 | सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ मंगळवार, दि. २५ ऑगस्ट २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १२५ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028


## आतापर्यंत साडेबारा लाखांपेक्षा जास्त शेतकऱ्यांना लाभ

**मुंबई :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातील ६,३६,०३६ पात्र शेतकऱ्यांना ₹५,०८६ कोटींच्या कर्जमुक्तीचा लाभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते थेट ऑनलाइन पद्धतीने वितरित करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, या योजनेच्या अंमलबजावणीअंतर्गत आतापर्यंत १२,५८,२४३ शेतकऱ्यांना एकूण ₹१०,११५ कोटींच्या कर्जमुक्तीचा लाभ देण्यात आला आहे.

## सर्वोच्च न्यायालयात आत्मसमर्पण प्रमाणपत्रावरून खडाजंगी

**नवी दिल्ली :** 'तेहलका' मासिकाचे माजी संपादक तरुण तेजपाल यांच्याशी संबंधित २०१३ च्या बहुचर्चित बलात्कार प्रकरणाची सुनावणी सोमवारी २४ ऑगस्ट रोजी सर्वोच्च न्यायालयात पार पडली. न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्या एकल खंडपीठासमोर झालेल्या या सुनावणीदरम्यान गोवा सरकार आणि तरुण तेजपाल यांच्या वकिलांमध्ये जोरदार युक्तिवाद पाहायला मिळाला. सर्वोच्च न्यायालयाच्या नियमानुसार, कोणत्याही उच्च न्यायालयाच्या शिक्षेला आव्हान देण्यापूर्वी संबंधित व्यक्तीने आत्मसमर्पण करणे आणि आत्मसमर्पण प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे.

# रेल्वे स्थानकाच्या विकासकामांची खा. संदिपान भूमरेंनी केली पाहणी

## पुनर्विकासाची कामे मुदतीत आणि गुणवत्तापूर्ण पूर्ण करण्याच्या सूचना

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्थानकाच्या सुरू असलेल्या पुनर्विकास कामांची खासदार संदिपान भूमरे यांनी रेल्वे विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून सविस्तर आढावा घेतला. स्थानकाच्या विकासकामांची प्रगती, दर्जा, प्रलंबित कामे तसेच प्रवाशांसाठी उपलब्ध होणाऱ्या सुविधांची माहिती घेत त्यांनी सर्व कामे निर्धारित कालमर्यादित आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले.




स्थानकाच्या पुनर्विकासासाठी मंजूर आराखडा व अंदाजपत्रकानुसारच कामे सुरू आहेत का, कामांची गुणवत्ता कोणत्या स्तरावर तपासली जाते, गुणवत्ता नियंत्रणाची यंत्रणा काय आहे आणि कामांची नियमित पाहणी कोणाकडून केली जाते, याबाबत खासदार भूमरे यांनी अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. कामाच्या गुणवत्तेत कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

स्थानकाच्या मुख्य इमारतीचे बांधकाम, प्रवेशद्वार, प्लॅटफॉर्मवरील विविध कामे, पिटलाईन, विद्युत कामे आणि इतर बांधकामांची सद्यस्थिती यांचा त्यांनी आढावा घेतला. तसेच १६ डब्यांच्या पिटलाईनचे काम, सौरऊर्जा व ऊर्जा बचतीशी संबंधित कामे, लिफ्ट व सरकते जिने, पार्किंग व्यवस्था, स्टेशन परिसरातील रस्ते, ड्रेनेज तसेच पावसाच्या पाण्याचा निचरा याबाबतही अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली.

प्रवाशांच्या सोयी-सुविधांनाही यावेळी विशेष प्राधान्य देण्यात आले. दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांसाठी आवश्यक सुविधा, स्वच्छता, पिण्याचे पाणी, सीसीटीव्ही आणि सुरक्षा व्यवस्था यांची पाहणी करून आवश्यक सुधारणा करण्याच्या सूचना खासदार भूमरे यांनी दिल्या.

शिवाजीनगर भुयारी मार्गात पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या पाणी साचण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याबाबतही त्यांनी अधिकाऱ्यांशी चर्चा केली. तसेच रोटेगाव, परसोडा आणि करंजगाव रेल्वे स्थानकांवर प्रवाशांसाठी आवश्यक सुविधा आणि सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करून देण्याबाबत सूचना करण्यात आल्या.

"सर्व प्रलंबित विकासकामे निर्धारित कालमर्यादित पूर्ण करून त्याचा प्रत्यक्ष लाभ प्रवाशांना मिळाला पाहिजे. मंजूर आराखडा, अंदाजपत्रक आणि कामाच्या गुणवत्तेत कोणतीही तडजोड होता कामा नये. संबंधित अधिकाऱ्यांनी नियमित पाहणी करून कामे वेळेत पूर्ण होतील याची दक्षता घ्यावी," असे निर्देश खासदार संदिपान भूमरे यांनी दिले.

छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्थानकाचा पुनर्विकास हा शहराच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रकल्प असून, प्रवाशांना आधुनिक व दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कामांना गती देण्यावर खासदार भूमरे यांनी यावेळी भर दिला.

# 'जुना पॅटर्न विसरा शाळांचा कायापालट करा'

### शिंदें यांनी दिले प्री कॅबिनेट बैठकीत 15 कलमी निर्देश

**मुंबई :** राज्यातील प्रत्येक शाळा आधुनिक सुविधा, गुणवत्तापूर्ण शिक्षण, विज्ञान-तंत्रज्ञान, क्रीडा आणि संस्कार यांचा संगम असलेले विद्यार्थीकेंद्रित शिक्षणकेंद्र बनावे, यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी प्री-कॅबिनेट बैठकीत शैक्षणिक विकासासाठी महत्त्वपूर्ण निर्देश दिले. शाळांच्या विकासासाठी डीपीडीसी निधीतील तरतूद ५ टक्क्यांवरून २० टक्क्यांपर्यंत वाढविण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. उपलब्ध निधीतून शाळांच्या इमारती, वर्गखोल्या, स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी, क्रीडांगणे, प्रयोगशाळा आणि डिजिटल सुविधांना प्राधान्य देण्याचे सांगण्यात आले. तसेच दादाजी भुसे यांनी दिलेल्या निधीच्या क्रमवारीनुसार विकासकामे नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. शालेय पोषण आहाराची नियमित व काटेकोर तपासणी करून अनियमितता आढळल्यास दोषींवर कठोर कारवाई करण्याचे स्पष्ट करण्यात आले. पूर्ण झालेल्या सर्व शालेय विकासकामांचे तृतीय-पक्षीय लेखापरीक्षण करून पारदर्शकता आणि गुणवत्तेची खात्री करण्यावर भर देण्यात आला. शालेय विकासासाठी एमजीएनआरईजीएस, डीपीडीसी आणि सीएसआर निधीचा प्रभावी वापर करून शाळांची मैदाने आणि कंपाऊंड वॉलसह आवश्यक सुविधा निर्माण करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

सातारा-सांगलीतील जिल्हाधिकारी जितेंद्र दुडी पॅटर्नचा अभ्यास करून तो राज्यभर राबविण्याचा प्रयत्न करावा, तसेच ठाणे जिल्ह्यात डीपीडीसी निधीतून झालेल्या भरीव शालेय खर्चाच्या धर्तीवर इतर जिल्ह्यांत निधीचा प्रभावी वापर करावा, असे निर्देश देण्यात आले.

'जुना पॅटर्न विसरून आधुनिक, गुणवत्तापूर्ण आणि विद्यार्थीकेंद्रित शाळा' विकसित करण्यावर भर देताना अहिल्यानगरमधील सीएसआर मॉडेलचा राज्यभर विस्तार करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

## थोडक्यात वार्ता

### 'हिट अँड रन'चा थरार; हतनूर शिवारात दुचाकीला अज्ञात वाहनाची धडक, एकाचा मृत्यू

**कन्नड :** दि.२४ ऑगस्ट - सोलापूर–धुळे राष्ट्रीय महामार्गावर हतनूर परिसरात हॉटेल शिवराजसमोर भरधाव अज्ञात वाहनाने दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक देऊन घटनास्थळावरून पलायन केल्याची घटना १० ऑगस्ट रोजी रात्री घडली. या 'हिट अँड रन' अपघातात दुचाकीस्वार विजय पदम चव्हाण (रा. पाथर्डी, ता. चाळीसगाव, जि. जळगाव) यांचा मृत्यू झाला. विजय चव्हाण हे पत्नी सविता यांच्यासह दुचाकीवरून छत्रपती संभाजीनगरकडून त्यांच्या पाथर्डी गावाकडे जात होते. रात्री सुमारे १० वाजण्याच्या सुमारास ते हतनूर परीसरातील हॉटेल शिवराजसमोर आले असता पाठीमागून कन्नडच्या दिशेने येणाऱ्या अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक इतकी जोरदार होती की, विजय चव्हाण यांच्यासह त्यांच्या पत्नी सविता रस्त्यावर कोसळल्या. दोघांनाही दुखापत झाली. अपघातानंतर काही क्षण परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. मात्र, धडक देणाऱ्या वाहनचालकाने जखमींना मदत करण्यासाठी वाहन थांबविण्याऐवजी वाहनासह घटनास्थळावरून पलायन केले. त्यामुळे हा प्रकार 'हिट अँड रन' ठरला आहे.

### सुभाष राठोड मृत्यू प्रकरणी नातेवाईकांचे ठिय्या आंदोलन

**कन्नड :** सुभाष राठोड यांच्या मृत्यू प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करावी, तसेच कन्नड ग्रामीण रुग्णालयातील आरोग्य व्यवस्था सुधारावी, या मागण्यांसाठी त्यांच्या नातेवाईकांनी सोमवारी कन्नड ग्रामीण रुग्णालय परिसरात ठिय्या आंदोलन सुरू केले. सुभाष राठोड यांच्या मृत्यूच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय सुविधा, तातडीच्या उपचारांची उपलब्धता आणि प्रशासनाच्या कार्यपद्धतीबाबत नातेवाईक व नागरिकांमध्ये नाराजी आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. रुग्णालयात ट्रॉमा केअर युनिट उपलब्ध असतानाही अपघातग्रस्त रुग्णांना आवश्यक ती तातडीची तपासणी व उपचार मिळतात का, रुग्णवाहिका वेळेवर उपलब्ध होते का, डॉक्टर व परिचारिका नियमितपणे ड्युटीवर उपस्थित असतात का, तसेच वैद्यकीय कर्मचाऱ्यांचे मुख्यालयी वास्तव्य आहे का, याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली.

### 'लालबागच्या राजा'चे 'भुलेश्वरच्या राजा'वर वडीलकीचे छत्र; 21 लाखांची आर्थिक मदत जाहीर

**मुंबई :** मुंबईतील ऐतिहासिक आणि प्रसिद्ध 'भुलेश्वरचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळा'वर ओढवलेल्या दुर्दैवी संकटाच्या काळात 'लालबागच्या राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळा'ने संवेदनशील पुढाकार घेत वडीलकीचे छत्र धरले आहे. मंडळावर ओढवलेल्या दुःखात पाठीशी खंबीरपणे उभे राहत लालबागचा राजा मंडळाने एकूण २१ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. काही दिवसांपूर्वी भुलेश्वरचा राजा गणेशोत्सव मंडळाची गणेशमूर्ती आणताना झालेल्या भीषण दुर्घटनेत मंडळाचे मानद सचिव संकेत नेवशे आणि कार्यकर्ते ब्रिजेश जोशी या दोन निष्ठावंत गणेशभक्तांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. या हृदयद्रावक घटनेमुळे संपूर्ण गणेशोत्सव वर्तुळात तसेच भुलेश्वर परिसरात तीव्र शोककळा पसरली आहे. या कठीण प्रसंगात लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने सामाजिक बांधिलकी जपत मदतीचा हात पुढे केला आहे. मंडळाचे मानद सचिव सुधीर साळवी यांनी या संदर्भातील अधिकृत घोषणा केली. भुलेश्वरचा राजा गणेशोत्सव मंडळाला झालेल्या नुकसानीतून सावरण्यासाठी ११ लाख रुपयांचा निधी देण्यात आला आहे तर दुर्घटनेत प्राण गमावलेले दिवंगत सचिव संकेत नेवशे यांच्या कुटुंबाला ५ लाख रुपये आणि दिवंगत ब्रिजेश जोशी यांच्या कुटुंबाला ५ लाख रुपये अशी प्रत्येकी ५ लाखांची आर्थिक मदत करण्यात आली आहे.

## महानगरपालिका भरती: 5 महत्त्वाच्या पदांचे निकाल जाहीर; उमेदवारांमध्ये उत्सुकता!

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील गट-क मधील विविध संवर्गातील सरळसेवेच्या रिक्त पदांसाठी घेण्यात आलेल्या परीक्षांचे निकाल जाहीर होण्यास सुरुवात झाली आहे. महानगरपालिकेच्या वतीने आयबीपीएस कंपनीमार्फत जुलै महिन्यात विविध ११ संवर्गातील एकूण २२२ पदांसाठी ऑनलाईन लेखी परीक्षा घेण्यात आल्या होत्या. या परीक्षेच्या निकालाबाबत महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त-१ कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या अधिकृत माहितीनुसार, आयबीपीएस कंपनीकडून पहिल्या टप्प्यात ५ प्रमुख पदांचे निकाल प्राप्त झाले आहेत. यामध्ये उपअग्निशमन केंद्र अधिकारी, सहाय्यक सुरक्षा अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक, उद्यान सहाय्यक, कृषी सहाय्यक आणि अनुरेखक या पदांचा समावेश आहे.

सदर जाहीर झालेले सर्व निकाल छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. संबंधित परीक्षा दिलेल्या उमेदवारांनी मनपाच्या संकेतस्थळाला भेट देऊन आपले निकाल तपासून घ्यावेत, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. तसेच, उर्वरित पदांचे निकाल देखील लवकरच प्राप्त होऊन जाहीर केले जाण्याची शक्यता असून, पात्र उमेदवारांची अंतिम निवड आणि प्रतिक्षा यादी तयार करण्याची कार्यवाही वेगाने सुरू आहे.

## छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या अवैध कत्तल विरोधी पथकाची धडक कारवाई

# 900 किलो गोमांसासह बोलेरो पिकअप जप्त, एकाविरुद्ध गुन्हा दाखल

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहरामध्ये बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या गोवंश मांस तस्करीवर आणि अवैध कत्तलींवर चाप लावण्यासाठी महानगरपालिकेच्या अवैध कत्तल विरोधी पथकाने आज सकाळी एक अत्यंत धडक आणि आक्रमक कारवाई केली आहे. मिळालेल्या अधिकृत माहितीनुसार, दिनांक २४ ऑगस्ट रोजी सकाळी ठीक ८.०० वाजताच्या सुमारास महापालिकेचे अवैध कत्तल विरोधी पथक शासकीय वाहनाने (क्र. MH-२०-CU-०३५९) शहरामध्ये नियमित गस्त घालत होते. गस्तीदरम्यान हे पथक बेगमपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या कोहिनूर कॉलनी परिसरात आले असता, तिथे एक संशयित बोलेरो पिकअप वाहन (क्र. MH-२०-DE-५९३५) आढळून आले. पथकाने तात्काळ सतर्क होऊन सदर वाहनाची कसून तपासणी केली असता, त्या गाडीमध्ये गोवंश जातीचे अंदाजे ९०० किलो मांस बेकायदेशीरपणे वाहतूक केले जात असल्याचे उघडकीस आले.

घटनास्थळी तात्काळ कायदेशीर प्रक्रिया राबवत दोन पंचांच्या उपस्थितीत सविस्तर पंचनामा करण्यात आला. तसेच खडकेश्वर येथील पशुसंवर्धन अधिकारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी जप्त करण्यात आलेल्या मांसाचे योग्य नमुने पुढील रासायनिक व कायदेशीर तपासणीसाठी सील केले. या प्रकरणी महापालिकेचे पशुधन पर्यवेक्षक अधिकारी लक्ष्मण संतोष फुले यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोसिफ मुकीत मन्यार (वय २३ वर्षे, रा. देवगाव रंगारी, ता. कन्नड) या आरोपीविरुद्ध बेगमपुरा पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम १९७६ चे कलम (५-अ, ब, क) व भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ चे कलम ३२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील सखोल तपास बेगमपुरा पोलीस करत आहेत.

अवैध गोवंश तस्करी करणाऱ्यांवर कडक व कायदेशीर बडगा उगारणारी ही धडक कारवाई महानगरपालिकेच्या विविध विभागांच्या संयुक्त पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली. यामध्ये पथकप्रमुख तथा फिर्यादी म्हणून पशुधन पर्यवेक्षक अधिकारी लक्ष्मण संतोष फुले, प्र. पशुवैद्यकीय अधिकारी, अन्न सुरक्षा अधिकारी, वाहन चालक दीपक सोनाजी साळवे, कर्मचारी अब्दुल वाजेद शेख वजीर, तसेच सुरक्षा रक्षक राखी नारायण राक्षे आणि सय्यद शारेक सय्यद नवाब यांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. शहरात अशा प्रकारे सुरू असलेल्या बेकायदेशीर कृत्यांवर महापालिकेच्या वतीने यापुढेही अशीच कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला असून, या कारवाईमुळे अवैध व्यावसायिकांचे चांगलेच धाबे दणाणले आहेत.

## भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय स्मारक वेळेत पूर्ण करावे; मंत्री संजय शिरसाट

**मुंबई :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या इंदू मिल, दादर येथील स्मारकाचे काम दर्जेदार पद्धतीने आणि निर्धारित कालावधीत पूर्ण करावे. कामाची गुणवत्ता, सुरक्षितता आणि वेळेचे नियोजन याला सर्वोच्च प्राधान्य देऊन संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिले. इंदू मिल येथे उभारण्यात येत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य स्मारकाच्या कामाचा सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी आढावा घेतला. स्मारकाच्या विविध भागांमध्ये सुरू असलेली कामे, आवश्यक साहित्याची उपलब्धता, वाढीव कामे तसेच प्रकल्पाच्या पुढील टप्प्यांबाबत शासकीय निवासस्थानी आढावा घेतला.

मंत्री शिरसाट म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाची उंची ४५० फूट ( पदपीठ १०० फूट व पुतळ्याची उंची ३५० फूट असणार आहे. हे स्मारक देशासह जगभरातील नागरिकांसाठी प्रेरणास्थळ ठरणार असल्याने त्याची उभारणी जागतिक दर्जाची असावी, यासाठी विशेष दक्षता घ्यावी. स्मारकाच्या इमारतीचे बहुतांश काम पूर्ण झाले असून उर्वरित काम प्रगतिपथावर आहे. कामाच्या विविध टप्प्यांमध्ये प्रभावी समन्वय राखण्यासाठी सक्षम व्यवस्थापन यंत्रणा कार्यरत ठेवावी असेही त्यांनी सांगितले.

प्रकल्पाचे काम निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ, साहित्य आणि यंत्रसामग्री पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून देण्यात यावी. कामाची गती कायम ठेवण्यासाठी आवश्यकतेनुसार २४ तास कामकाजाचे नियोजन करून विविध एजन्सींमध्ये समन्वय साधावा, तसेच वाढलेल्या कामाचा सविस्तर प्रस्ताव सादर करण्याचे एमएमआरडीए प्राधिकरण यांना निर्देश देण्यात आले.

स्मारक परिसर संपूर्ण हरित परिसर म्हणून विकसित करण्यात येणार असून, येथे सुमारे १ हजार व्यक्तींची आसनक्षमता असलेले सभागृह, संशोधन केंद्र, ध्यानधारणा केंद्र, ग्रंथालय आणि भूमिगत वाहनतळ यांसारख्या सुविधा उपलब्ध असणार आहेत. तसेच स्मारकाचे तीव्र वादळांसह नैसर्गिक आपत्तींपासून संरक्षण करण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांची माहितीही यावेळी देण्यात आली.

## मनपाच्या नऊ नगरसेवक व नगरसेविकांच्या सदस्यत्व अपात्रतेबाबत सुनावणी संपन्न

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिकेच्या सदस्यांविरोधात दोनपेक्षा अधिक अपत्ये, अतिक्रमण, अनधिकृत बांधकाम तसेच शहागंज येथील अतिक्रमणाला प्रोत्साहन देण्यासंबंधित दाखल झालेल्या गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १० (१) आणि १० (१-ड) नुसार सदस्यत्व अपात्रतेबाबत टप्प्याटप्प्याने सुनावण्या घेण्यात येत आहेत. याच अनुषंगाने आज महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांच्यासमोर एकूण नऊ नगरसेवक व नगरसेविकांची सुनावणी पार पडली.

काल झालेल्या सुनावणीदरम्यान दोनपेक्षा अधिक अपत्ये असलेल्या प्रकरणांमध्ये फेरोज खान, शेख नरगीस सलीम आणि मोहम्मद वसीम यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अतिक्रमणाला प्रोत्साहन दिल्याप्रकरणी गुन्हे दाखल असलेले मोहम्मद वाजेद, मेराज खान, आणि अतिक्रमण व अनधिकृत बांधकामांसंदर्भात सय्यद सोहेल, अब्दुल समीर, भारती सोनवणे व हिवराळे जिवकपाल यांची सुनावणी घेण्यात आली. या आधी १७ ऑगस्ट रोजी झालेल्या सुनावणीत अभिजीत जीवनवाल, गणेश नावंदर, नुर जहान इकबाल, फिरोज खान, खान अब्दुल मतीन, मोहम्मद वसीम, सय्यद सोहेल, मेराज खान आणि मुंशी भिकन शेख यांची सुनावणी घेण्यात आली होती. प्रशासन आगामी काळातही ही प्रक्रिया सुरू ठेवणार असून, पुढील टप्प्यात ०७ सप्टेंबर रोजी नऊ सदस्यांची तर १५ सप्टेंबर रोजी अकरा सदस्यांची सुनावणी नियोजित आहे. दरम्यान, आज सुनावणी झालेल्या सदस्यांनी आपले म्हणणे मांडण्यासाठी अतिरिक्त वेळ देण्याची मागणी केली असून, त्यानुसार त्यांना पुढील तारीख लेखी स्वरूपात कळविण्यात येईल, अशी माहिती महानगरपालिका निवडणूक विभागा तर्फे देण्यात आली आहे.

## "शाल जोडे"




# बातमीचा दणका : फर्दापूरमधील केमिकल पाण्यावर आरोग्य विभागाकडून 14 बोअरवेलचे नमुने तपासणीसाठी रवाना

हिंदू प्रकाशवार्ता / शेख हक्कानी

फर्दापूर दि. २४ ऑगस्ट २०२६

फर्दापूर येथील बोअरवेलच्या पाण्याला केमिकल आणि पेट्रोलसारखा उग्र वास येत असल्याच्या गंभीर प्रकारावर अखेर प्रशासनाला जाग आली आहे दैनिक हिंदू प्रकाश वार्ता ने या जीवघेण्या प्रश्नाला वाचा फोडल्यानंतर आज दि. २४ ऑगस्ट आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी थेट गावात धडक देत तब्बल 14 बोअरवेलच्या पाण्याचे नमुने तपासणीसाठी गोळा केले आहेत




फर्दापूरकरांच्या जीवाशी खेळ पिण्याच्या पाण्यातून येतोय 'पेट्रोल केमिकल'चा वास 35 वर्षे विकत पाणी घेणारे भारतातील एकमेव गाव

पर्यटन स्थळ असूनही प्रशासनाचा ढिसाळ कारभार बोगस नळ योजनेमुळे मजुरांवर रोज पाणी विकत घेण्याची नामुष्की

बातमीचा मोठा इम्पॅक्ट

फर्दापूरमध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असून बोअरवेलच्या पाण्यातून केमिकलचा वास येत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला होता या ज्वलंत समस्येवर २० ऑगस्ट २०२६ रोजी 'दैनिक हिंदू प्रकाश वार्ता'ने अत्यंत सविस्तर आणि धडक बातमी प्रकाशित केली होती या बातमीची सर्व संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गंभीर दखल घेतली बातमीचा दणका एवढा मोठा होता की प्रशासकीय यंत्रणा वेगाने हलली आणि तातडीने कारवाईचे आदेश देण्यात आले

आरोग्य विभागाची गावात धाव

आज २४ ऑगस्ट रोजी आरोग्य केंद्राचे अधिकारी आणि कर्मचारी यांनी फर्दापूर गावात प्रत्यक्ष भेट दिली आरोग्य कर्मचारी अमोल धमके आणि विजय पंडित व रतन दामोदर ग्राम विकास अधिकारी सुनील मंगरुळे यांनी ज्या बोअरवेलच्या पाण्याला वास येत होता अशा परिसरातील एकूण 14 बोअरवेलच्या पाण्याचे नमुने गोळा केले

**प्रयोगशाळेच्या अहवालाकडे लक्ष :** हे सर्व नमुने आता पुढील शास्त्रीय तपासणीसाठी छत्रपती संभाजीनगर येथील मुख्य प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत प्रयोगशाळेचा अहवाल आल्यानंतरच या पाण्यात नेमके कोणते घातक रसायन मिसळले आहे आणि हा वास कशामुळे येत आहे याचा उलगडा होणार आहे

**हिंदू प्रकाश वार्ता ठरला जनतेचा आवाज :** नागरिकांच्या जिवाशी खेळणाऱ्या या प्रश्नाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत होते मात्र 'दैनिक हिंदू प्रकाश वार्ता'ने हा मुद्दा लावून धरल्याने प्रशासनाला तातडीने पावले उचलावी लागली. आरोग्य विभागाच्या या कारवाईमुळे ग्रामस्थांना काहीसा दिलासा मिळाला असून नागरिकांनी हिंदू प्रकाश चे विशेष आभार मानले आहेत आता सर्वांचे लक्ष या पाण्याच्या तपासणी अहवालाकडे लागले आहे

# संपादकीय

## कायदेशीर प्रक्रिया, तांत्रिक पेच आणि न्यायाची प्रतीक्षा

'तेहलका' मासिकाचे माजी संपादक तरुण तेजपाल यांच्याशी संबंधित २०१३ च्या बहुचर्चित प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयात झालेली सुनावणी ही केवळ एका हायप्रोफाईल खटल्यापुरती मर्यादित नसून, ती फौजदारी न्यायप्रक्रियेतील कायदेशीर नियम आणि तांत्रिक नियमावलीची व्याप्ती स्पष्ट करणारी आहे. न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्या एकल खंडपीठासमोर झालेला हा युक्तिवाद, उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देताना आत्मसमर्पणाचे नियम कसे लागू होतात, यावर महत्त्वाचा प्रकाश टाकतो. सर्वोच्च न्यायालयाच्या नियमांनुसार कोणत्याही शिक्षेला किंवा निर्णयाला आव्हान देण्यापूर्वी आरोपीने आत्मसमर्पण करणे किंवा त्यातून सूट मिळवण्यासाठी अर्ज करणे अनिवार्य असते. सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी गोव्याच्या वतीने मांडलेली भूमिका ही कायदेशीर नियमांच्या कठोर अंमलबजावणीवर भर देणारी आहे. दुसरीकडे, बचाव पक्षाचे वकील कपिल सिबल यांनी उच्च न्यायालयाने दिलेल्या दिलाशाचा हवाला देत, प्रकरणातील गुणवत्तेवर आणि उपलब्ध पुराव्यांवर लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न केला आहे. दोन्ही बाजूंच्या कायदेशीर पेचांमुळे हा खटला पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. हे प्रकरण गेल्या दशकभरापासून कायदेशीर प्रक्रियेच्या विविध टप्प्यांतून जात आहे. अशा संवेदनशील प्रकरणांमध्ये न्यायदान प्रक्रियेतील पारदर्शकता आणि कायद्याचे समान अधिराज्य अबाधित राहणे अत्यंत गरजेचे असते. उच्च न्यायालयाच्या निष्कर्षांवरून निर्माण झालेला वाद आणि सर्वोच्च न्यायालयातील ही याचिका यामुळे आता सर्वोच्च न्यायालय या तांत्रिक व कायदेशीर मुद्द्यावर काय भूमिका घेते, याकडे कायदेतज्ज्ञांचे लक्ष लागले आहे. कायद्यासमोरील समानता हे आपल्या न्यायव्यवस्थेचे मूळ तत्त्व आहे. त्यामुळेच, प्रकरणाचे गांभीर्य आणि प्रदीर्घ काळापासून सुरू असलेली सुनावणी लक्षात घेता, या तांत्रिक पेचावर सर्वोच्च न्यायालयाकडून येणारा आदेश भविष्यातील तत्सम याचिकांसाठी एक महत्त्वाचा वस्तुपाठ आणि मार्गदर्शक ठरेल.


# मराठीच्या लेखन मार्गदर्शिका अभ्यासक : यास्मिन शेख

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला, याचा आनंद साजरा करत असतानाच तो दर्जा टिकवण्याची जबाबदारी कोणाची, हा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. शासन निर्णय काढते, फलक लागतात, सोहळे होतात. पण भाषा जगते आणि टिकते ती अशा काही व्रतस्थ माणसांमुळे, ज्यांनी कोणताही गाजावाजा न करता, कोणत्याही प्रसिद्धीच्या हव्यासाशिवाय आयुष्यभर एकाच ध्यासाने भाषेची सेवा केली. अशाच एका व्रतस्थ अभ्यासक म्हणजे यास्मिन शेख.

यास्मिन शेख यांचे नाव घेतले की अनेकांच्या मनात पहिला प्रश्न येतो, आडनाव शेख आणि काम मराठी व्याकरणाचे? पण हाच तर या व्यक्तिमत्त्वाचा खरा गौरव आहे. त्यांनी आपल्या संपूर्ण हयातीने हे सिद्ध केले की धर्माचा आणि मातृभाषेचा काहीही संबंध नसतो. भाषा ही रक्तात असते, मातीत असते, संस्कारात असते.

यास्मिनबाईंचा जन्म नाशिकचा. त्यांच्या आई-वडिलांना वाचनाची विलक्षण आवड होती. आज ज्या घरात टीव्हीचा आवाज घुमतो, त्या काळी त्यांच्या घरात पुस्तकांचा दरवळ होता. किर्लोस्कर, मनोहर, स्त्री यासारखी दर्जेदार मासिके नियमितपणे घरात येत असत. त्यामुळे अक्षरओळख होण्याआधीच अक्षरांची गोडी लागली. वडिलांची नोकरी बदलीची असल्याने त्यांचे काही शिक्षण पंढरपुरात झाले. पंढरपूर म्हटले की विठ्ठल, पण त्याचबरोबर संतवाङ्मयाची समृद्ध परंपरा. या संतवाणीचा संस्कारही नकळत मनावर होत असणार. पुढे पुण्यात स. प. महाविद्यालयात त्या शिकायला आल्या आणि त्यांच्या आयुष्याला खरा आकार मिळाला. तिथे त्यांना लाभले प्रा. श्री. म. माटे. माटे सर म्हणजे मराठीतील एक ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व. त्यांच्या सहवासात यास्मिनबाईंची मराठीवरील प्रेमाची भावना व्याकरणाच्या शिस्तीत बांधली गेली. केवळ कथा-कविता आवडणे वेगळे आणि भाषेच्या मुळाशी जाऊन तिचा व्याकरणविचार करणे वेगळे. माटे सरांनी त्यांच्यातील ही चिकित्सक विद्यार्थिनी ओळखली. महाविद्यालयाच्या मासिकात त्यांच्या कथा प्रसिद्ध होऊ लागल्या, सर नेहमी कौतुक करत. त्या सर्व विषयांत पहिल्या येत होत्या. पण त्यांचे मन रमले ते भाषेच्या शुद्धतेत, व्याकरणाच्या नियमांत.

शिक्षण पूर्ण झाल्यावर त्या मुंबईच्या एस.आय.ई.एस. महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून रुजू झाल्या. तेव्हा तिथे पु. भागवत विभागप्रमुख होते. भागवतांसारखा द्रष्टा संपादक आणि भाषातज्ज्ञ भेटणे हे त्यांचे भाग्यच. त्यांनी यास्मिनबाईंना एक मोलाचा सल्ला दिला - केवळ व्याकरणाच्या अभ्यासावर थांबू नका, त्याला भाषाशास्त्राची जोड द्या. व्याकरण म्हणजे नियमांची यादी नव्हे, तर भाषेच्या जगण्याचे शास्त्र आहे, हे त्यांना उमगले. त्यांनी पंधरा दिवसांचा एक भाषाशास्त्राचा अभ्यासक्रम पूर्ण केला आणि पुढे विदा करंदीकर यांच्या मार्गदर्शनाखाली एम.फिल. केले. त्यामुळे मराठीचे उत्तमोत्तम संस्कार त्यांच्यावर झाले. नाशिकला असताना वसंत कानेटकरांनी त्यांचे लग्न जमवले. शेख हे पुरोगामी मुस्लिम कुटुंब. मुळात त्यांचे पूर्वज काश्मिरी, फार पूर्वी काश्मिरी इस्लामपूर्वी परदेशी आक्रमणानंतर काही जणू भारतात आलेले. पण यास्मिनबाई सांगतात, माझा धर्म माणुसकी हाच आहे.



आज मराठीची स्थिती काय आहे हे आपण पाहतो. सोशल मीडियावर, वृत्तवाहिन्यांवर, अगदी साहित्यिक म्हणवणाऱ्या लेखनातही प्रमाणभाषेचा बोजवारा उडालेला दिसतो. अशा वेळी यास्मिनबाईंसारख्या अभ्यासकाची आठवण अधिक तीव्रतेने येते. त्यांना मराठीत कुठे चूक दिसली की जणू अंगावर ओरखडा काढल्यासारखे दुःख होते, असे त्या लेखात म्हटले आहे. हे वाक्य अतिशयोक्ती नाही. भाषेवर प्रेम करणाऱ्या माणसाला व्याकरणाची चूक ही केवळ चूक वाटत नाही, ती संस्कृतीवरचा आघात वाटतो.

त्यांनी या वेदनेतूनच दोन अत्यंत महत्त्वाची पुस्तके लिहिली.

" मराठी शुद्धलेखन कोश " आणि " मराठी लेखन मार्गदर्शिका."

शुद्धलेखन कोश म्हणजे काय? तर अनेकांना वाटते की हे शब्दकोशासारखे आहे. पण हा कोश म्हणजे मराठी भाषेचा आरसा आहे. -हस्व दीर्घ, रफार, अनुस्वार, जोडाक्षरे याबत मराठीत प्रचंड गोंधळ आहे. यास्मिनबाईंनी अत्यंत परिश्रमाने, प्रत्येक शब्दाची व्युत्पत्ती तपासून, प्रमाण रूप काय असावे हे ठरवून हा कोश सिद्ध केला. आज तो प्रत्येक शाळेत, प्रत्येक संपादकीय विभागात, प्रत्येक लेखकाच्या टेबलावर असायला हवा.

त्यांची दुसरी भूमिका म्हणजे `अंतर्नाद 'या दर्जेदार मराठी मासिकाच्या व्याकरण सल्लागार म्हणून. एखाद्या मासिकाने व्याकरणासाठी स्वतंत्र सल्लागार नेमावा, ही मराठी नियतकालिकांच्या इतिहासात दुर्मिळ घटना आहे. `अंतर्नाद 'ने हा प्रयोग केला आणि यास्मिनबाईंनी हे पद तब्बल २३ वर्षे अखंड सांभाळले. म्हणजे दर महिन्याला येणारे लेख तपासणे, लेखकांना समजावून सांगणे, चूक का चूक आहे हे पटवून देणे. हे काम संपादकाचे नाही, तर शिक्षकाचे आहे. आणि त्यांनी ते न कंटाळता केले.

यास्मिनबाई नेहमी सांगतात, भाषा हा सर्वश्रेष्ठ सांस्कृतिक वारसा आहे. तो जपणे, समृद्ध करणे हे आपले कर्तव्य आहे. भाषा ही संस्कृतीची वाहक आहे. मराठी ही केवळ संवादाचे साधन नाही, ती आपल्या संतांनी, पंडितांनी, शाहिरांनी जपलेली विचारपरंपरा आहे.

त्यामुळेच त्यांचा आग्रह असतो - प्रमाणभाषा वापरलीच पाहिजे. प्रमाणभाषा म्हणजे काहीतरी कृत्रिम, पंडिती भाषा नव्हे. तर ती सर्वांना समजेल अशी, शुद्ध आणि नेटकी भाषा आहे. बोलीभाषा आपल्या जागी आहेतच, त्यांचा लहेजा, त्यांची गोडी वेगळी. पण जेव्हा आपण लिहितो, जेव्हा आपण सार्वजनिक ठिकाणी बोलतो, तेव्हा प्रमाणभाषेचा मान राखला पाहिजे. शब्दांचा योग्य वापराने संवाद अधिक सुलभ होतो, अधिक सुंदर होतो, हे त्या आपल्या हसऱ्या चेहऱ्याने पटवून देतात.

त्यांच्या या कार्याचा गौरव महाराष्ट्र साहित्य परिषदेने "जीवनगौरव पुरस्कार" देऊन केला. शिवाय शासनाने अशोक केळकर यांच्या नावाचा पुरस्कार त्यांना देऊन त्यांच्या भाषाविषयक साधनेचा सन्मान केला. हे पुरस्कार त्यांच्यासाठी महत्त्वाचे असतीलही, पण त्यांच्यापेक्षा महत्त्वाचे आहे ते एका पिढीने त्यांच्याकडून घेतलेले शुद्ध मराठीचे बाळकडू.

आजच्या काळात यास्मिन शेख यांचे कार्य अधिक बोलके होते. जेव्हा भाषेच्या नावावर द्वेष पसरवला जातो, तेव्हा एक मुस्लिम स्त्री मराठीसाठी आयुष्य वेचते, हे चित्रच अनेक भ्रमांचा भोपळा फोडते. त्या स्वतःला अभिमानाने मराठी म्हणवतात. माझी मातृभाषा मराठीच, असे त्या ठामपणे सांगतात. हा उच्चार केवळ भाषिक नाही, तो सांस्कृतिक एकात्मतेचा घोष आहे.

वयाच्या ९६ व्या वर्षीही त्यांचा उत्साह तरुणांना लाजवेल असा आहे. वयाच्या या टप्प्यावर आजही त्या विविध प्रकारच्या वाचनात गढून गेलेल्या असतात. डोळ्यांवर चष्मा, हातात पुस्तक आणि मनात मराठीच्या भवितव्याची चिंता, हे त्यांचे आजचे रूप आहे. मराठीला अभिजात दर्जा मिळवण्यासाठी जे प्रयत्न सुरू आहेत, त्यात यास्मिनबाईंसारख्या मौन साधकांचे योगदान काकणभर सरस आहे.

यास्मिन शेख या केवळ व्याकरणकार नाहीत. त्या मराठीच्या व्रतस्थ अभ्यासक आहेत, चालत्या-बोलत्या शुद्धलेखन कोश आहेत आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे भाषेवर निरपेक्ष प्रेम कसे करावे याचा जिवंत पाठ आहेत.त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली...!!

**- निवृत्ती दाभाडे**
**छत्रपती संभाजीनगर**

# प्रत्येक बालकापर्यंत गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा पोहोचवा : आयुक्त संजय काटकर

## समग्र शिशु बाल स्वास्थ्य कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राष्ट्रीय कार्यशाळा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जन्मापासून ३६ महिन्यांपर्यंतचा कालावधी हा बालकाच्या आरोग्य आणि विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असतो. त्यामुळे समाजातील प्रत्येक घटकातील प्रत्येक बालकापर्यंत सातत्यपूर्ण आणि गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा पोहोचविणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन आयुक्त आरोग्य सेवा संजय काटकर यांनी केले. समग्र शिशु बाल स्वास्थ्य कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आरोग्य यंत्रणेने समन्वयाने काम करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या बाल आरोग्य विभागाच्या वतीने छत्रपती संभाजीनगर येथे दि. २४ व २५ ऑगस्ट रोजी समग्र शिशु बाल स्वास्थ्य कार्यक्रमावर दोन दिवसीय राष्ट्रीय मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. हॉटेल हयात प्लेस येथे आयोजित कार्यशाळेचे उद्घाटन भारत सरकारच्या अपर सचिव तथा अभियान संचालक आराधना पटनाईक आणि आयुक्त आरोग्य सेवा संजय काटकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

यावेळी केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या बाल आरोग्य विभागाच्या डॉ. शोभना गुप्ता, जागतिक आरोग्य संघटनेच्या डॉ. पुष्पा देव चौधरी, नवी दिल्ली येथील केएससीएच-एलएचएमसीचे डॉ. प्रवीण कुमार, तसेच बाल आरोग्य विभाग, एनआयपीआय, युनिसेफचे प्रतिनिधी आणि राष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञ मार्गदर्शक उपस्थित होते.

कार्यशाळेला आरोग्य सेवा संचालक डॉ. विजय कंदेवाड, अतिरिक्त संचालक डॉ. संदीप सांगळे, उपसंचालक आरोग्य सेवा डॉ. कांचन वानेरे, सहाय्यक




उपसंचालक डॉ. दयानंद मोतीपवळे, कुटुंब व कल्याण प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य डॉ. संतोष कडले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कमलाकर मुदखेडकर, जिल्हा कार्यक्रम अधिकारी महिला व बालविकास विभाग डॉ. मंगल पांचाळ आणि अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. छाया आवरगावकर यांच्यासह आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

जोखमीच्या बालकांची वेळेत ओळख

समग्र शिशु बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत जन्मापासून ३६ महिन्यांपर्यंतच्या बालकांच्या आरोग्य सेवांना अधिक सक्षम करण्यावर कार्यशाळेत भर देण्यात येत आहे. पहिल्या दिवशी कार्यक्रमाची माहिती, माता व बाल आरोग्य सेवांचा आढावा, नवजात व बालकांमधील जोखमीचे वर्गीकरण, अतिजोखमीच्या बालकांची वेळेत ओळख व त्यांचे व्यवस्थापन, तसेच नवजात व लहान बालकांमधील धोक्याची चिन्हे ओळखून आवश्यक उपचार आणि संदर्भसेवा याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

घरभेटींच्या माध्यमातून आरोग्यसेवेचा पाठपुरावा

घर आधारित नवजात शिशू संगोपन सेवा (एचबीएनसी) आणि घर आधारित लहान बालक संगोपन सेवा (एचबीवायसी) यांच्या एकात्मिक अंमलबजावणीवरही कार्यशाळेत विशेष चर्चा करण्यात येत आहे. विविध जोखीम गटांनुसार घरभेटींचे नियोजन, अतिजोखमीच्या बालकांचा नियमित पाठपुरावा, आवश्यकतेनुसार संदर्भसेवा आणि उपचारांची सातत्यपूर्ण उपलब्धता यावर भर देण्यात येत आहे.

प्रसूतीनंतर मातांचे मानसिक आरोग्य, माता आरोग्यातील धोक्याची चिन्हे ओळखणे व व्यवस्थापन, नवजात व बालकांमधील गंभीर आजारांची लवकर ओळख, वेळेत उपचार आणि योग्य संदर्भसेवा याबाबतही सहभागी अधिकारी व कर्मचाऱ्यांना तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात येत आहे.

बाल आरोग्य सेवांची गुणवत्ता वाढविण्याचा उद्देश

राष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञांचे मार्गदर्शन, अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक प्रशिक्षण आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीबाबत सविस्तर माहिती देणे हा कार्यशाळेचा प्रमुख उद्देश आहे. जोखमीच्या बालकांची वेळेत ओळख, प्रभावी पाठपुरावा, गुणवत्तापूर्ण उपचार, योग्य संदर्भसेवा तसेच माता-बाल आरोग्य सेवांमध्ये सातत्य निर्माण करण्यासाठी ही कार्यशाळा महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# विश्वकर्मा पूजन दिनानिमित्त महारोजगार मेळाव्याची नियोजन बैठक संपन्न



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर (वेरूळ) :** विश्वकर्मा पूजन दिनानिमित्त १७ सप्टेंबर रोजी वेरूळ येथे आयोजित करण्यात येणाऱ्या विश्वकर्मा समाज महामेळावा व सर्वधर्मीय महारोजगार मेळाव्याच्या नियोजनासाठी विश्वकर्मा वंशीय समाज संघटनेच्या राज्य पदाधिकाऱ्यांची बैठक वेरूळ येथील विश्वकर्मा मंदिरात उत्साहात संपन्न झाली. मेळाव्याच्या माध्यमातून सर्वधर्मीय युवक-युवतींना रोजगार, स्वयंरोजगार व उद्योजकतेच्या संधी उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले.

यावर्षी विश्वकर्मा पूजन दिनानिमित्त विश्वकर्मा वंशीय समाजाचा भव्य महामेळावा आयोजित करण्यात आला आहे. त्यासोबतच बेरोजगार युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी सर्वधर्मीय महारोजगार अभियान राबविण्यात येणार आहे. विविध शासकीय योजना, आर्थिक सहाय्याच्या योजना तसेच रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधींची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

मेळाव्यात ओबीसी आर्थिक विकास महामंडळ, बांधकाम कामगार योजना, प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना, सुतार-लोहार-सोनार आर्थिक विकास महामंडळ आदी योजनांची माहिती देण्यासाठी विशेष माहिती स्टॉल उभारण्यात येणार आहेत. दिवसभर युवक-युवती, महिला व समाजबांधवांना विविध योजनांबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे.

उद्योग शिबिरासाठी आतापर्यंत २५ पेक्षा अधिक उद्योग व व्यवसाय स्टॉलची नोंदणी झाली असून, विविध उद्योगांच्या माध्यमातून रोजगार, व्यवसाय आणि उद्योजकतेच्या संधी उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. याशिवाय भव्य रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी बैठकीत विविध पदाधिकाऱ्यांवर जबाबदाऱ्या सोपवून कार्यक्रमाच्या तयारीचा आढावा घेण्यात आला. संस्थेचे संस्थापक प्रा. नागोराव पांचाळ यांनी मार्गदर्शन केले. वेरूळ विश्वकर्मा मंदिराचे महाराज महंत महेंद्र बापू यांचीही उपस्थिती होती.

बैठकीस राज्य कार्याध्यक्ष अरुण भालेकर, राज्य सचिव विलास पवार, राज्य संघटक राजकुमार राऊत, राज्य प्रवक्ते भाऊसाहेब राऊत, राज्य संपर्क प्रमुख भगवान राऊत, राज्य उपाध्यक्ष गोपाल राऊत, राज्य संघटक केशव सपकाळ, गणेश आढाव, विभागीय अध्यक्ष प्रसाद गडकर, अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष किरण मोरे, जालना जिल्हाध्यक्ष बालाजी सांगुळे, छत्रपती संभाजीनगर शहराध्यक्ष अमोल डोळस, शहर कार्याध्यक्ष किशोर सिरसाठ, शहर उपाध्यक्ष गणेश जाधव यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

१७ सप्टेंबर रोजी वेरूळ येथे होणारा हा सोहळा केवळ समाजाचा उत्सव न राहता सर्वधर्मीय युवक-युवतींसाठी रोजगार, स्वयंरोजगार व उद्योजकतेच्या संधी उपलब्ध करून देणारे प्रभावी व्यासपीठ ठरणार आहे. या महारोजगार मेळाव्याचा युवक-युवती, महिला, उद्योजक व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

# सुशिक्षित बेरोजगारांचा वाली कोण.?. सुशिक्षित तरुणाईला सन्मानाने जगता येईल का?

हिंदु प्रकाश वार्ता /अशोक पवार

पदवी घेऊनही रोजगार न मिळणारा तरुण अखेर. बाईक टॅक्सी चालवतो. ॲप आधारित डिलिव्हरी करतो किंवा टेलिकॉलिंगसारख्या तात्पुरत्या कामात आयुष्य ढकलतो. तरुणाईला सन्मानाने जगता येईल असे रोजगार निर्माण करण्याची योजना नाही.

अझीम प्रेमजी विद्यापीठाने नुकताच प्रसिद्ध केलेला स्टेट ऑफ वर्किंग इंडिया 2026 हा अहवाल केवळ कडे वारीचा गुच्छा नाही. तर तो भारताच्या तथाकथित डेमोग्राफिक डिव्हीडंट च्या फुग्याचा टोचणारे सुई आहे. गेली अनेक वर्षे केंद्र सरकार जगातील सर्वाधिक तरुण लोकसंख्या असलेला देश म्हणून भारताचे कौतुक करत आले. पण यात तरुणाईच्या हाताना काम देण्यात सरकार किती सपयशी ठरले. याचा हा अहवाल वारसा आहे.. विद्यापीठाच्या संशोधकांनी मांडलेली आकडेवारी वाचली की एक प्रश्न उभा राहतो. देशातील कोट्यावधी सुशिक्षित तरुणांचा वाली आहे तरी कोण.? जो.हे लेक वाचत असेल. तो सुद्धा मनातून आपण बेरोजगार आहोत. असे प्रश्न त्याच्या मनात येणे साहजिकच आहे.

अहवालानुसार 2023 मध्ये 20 ते 29 वयोगटातील बेरोजगार तरुणांमध्ये पदवीधरांचे प्रमाण तब्बल.67%. टक्क्यांवर पोहोचले आहे. ते 2004 मध्ये हेच प्रमाण अवघे 32% टक्के होते. म्हणजे गेल्या दोन दशकांत बेरोजगारांमधील पदवीधरांचे प्रमाण दुपटीहून अधिक वाढले. आणखी धक्कादायक बाब म्हणजे. 1983 मध्ये देशात 20 ते 29 वयोगटातील पदवीधर तरुणांची संख्या जेमतेम.50. लाख होती. ती आज.6. कोटी.30. लाखांवर पोहोचली आहे. म्हणजे चार दशकांत तेरा पटीने वाढ. शिक्षणाचा हा विस्तार वरवर पाहता अभिमानास्पद वाटतो. पण या शिक्षणाला रोजगाराची जोड मिळालीच नाही. हे या अहवालाचे सर्वात भेदक निरीक्षण आहे. संशोधकांनी नोंदवल्याप्रमाणे 2004-2005. ते 2023 या कालावधीत दरवर्षी सरासरी 50 लाख पदवीधर बाजारात दाखल होत असताना त्यापैकी जेमतेम.28. लाखांनाच काम मिळाले आणि त्याहूनही कमी जणांना कायमस्वरूपी पगारी नोकरी मिळाली. पुरुष पदवीधरापैकी योगेश साडेसहा ते सात टक्के तरुणांना पदवी घेतल्यानंतर एका वर्षाच्या आत कायमस्वरूपी पगारी नोकरी मिळते आणि पांढरपेक्षा म्हणजे कार्यालयीन नोकरी मिळणाऱ्यांचे प्रमाण तर अवघे साडेतीन टक्के आहे. 20 ते 25. वयोगटातील पदवीधरांमधील बेरोजगारीचे प्रमाण जवळपास.40%. टक्क्यांवर आहे. तर 25 ते 29 वयोगटात ते 20% टक्के टक्क्यांच्या घरात आहे. ही आकडेवारी केवळ संख्याशास्त्र नाही ही करोडो कुटुंबातील स्वप्नांची राख रांगोळी आहे ही आकडेवारी नवीन नाही. आंतरराष्ट्रीय कामगार संघटना आणि इन्स्टिट्यूट ऑफ हूमन डेव्हलपमेंट यांनी संयुक्तपणे प्रसिद्ध केलेल्या इंडिया एम्प्लॉयमेंट रिपोर्ट 2024 मध्येही असेच धक्कादायक चित्र समोर आले होते-देशातील एकूण बेरोजगारांमध्ये तरुणांचे प्रमाण.83%. टक्के इतके प्रचंड आहे आणि माध्यमिक किंवा उच्च शिक्षण घेतलेल्या तरुणांचे बेरोजगारांमधील प्रमाण 2000 मधल्या 35% टक्के वरून 2022 मध्ये 65% वर गेली आहे. दोन वेगवेगळ्या संस्थांचे दोन वेगवेगळ्या वर्षाचे अहवाल एकास निष्कर्षाप्रत येतात. तेव्हा हा योगायोग नसून तो एक संरचनात्मक आजार आहे. हे मान्य करावेच लागेल.

।। नोकरी मिळते पण पगार किती।।... आता प्रश्न असा येतो की ज्यांना नोकरी मिळतेच त्यांना नेमका किती पगार मिळतो?. सरकारी नोकरीचे आकर्षण आजही कायम आहे. कारण तिथे नोकरीची शाश्वती. निवृत्ती वेतन आणि सामाजिक प्रतिष्ठा मिळते. पण याच सरकारी भरतीच्या जाहिराती पाहिल्या की वास्तू समोर येते. बँकिंग क्षेत्रातील प्रशिक्षणार्थी पदांसाठी महिन्याला दहा ते पंधरा हजार रुपये स्टायपेंड दिला जातो. तर अनेक तांत्रिक सहाय्यक व कनिष्ठ अधिकारी पदांचे पगार महिन्याला 75 हजार ते सव्वा लाखाच्या घरात जाहिरातीमध्ये दाखवले जातात. पण अशा जागा हाताच्या बोटावर मोजण्याइतक्याच असतात. आणि त्यासाठी लाखो अर्जदार रांगेत उभे असतात. दुसरीकडे खासगी क्षेत्रात. विशेषत. कृत्रिम बुद्धिमत्ता. डेटा सायन्स. क्लाऊड कॉम्प्युटिंग आणि सायबर सुरक्षा या क्षेत्रात नवख्या अभियंत्यांनाही सुरुवातीलाच लाखाच्या घरात पॅकेज मिळू शकते. हे खरे आहे पण हे चित्र देशाच्या अवघ्या मुठभर आयटी शहरांपुरते आणि मुठभर उच्चशिक्षित अभियंत्यांपुरतेच मर्यादित आहे.

भांडवल उभारणारयांचे उखळ पांढरे...

फेब्रुवारी 2026 मध्ये देशभरातील या कंपन्यांच्या चालकांनी पुकारलेला संप हा या असंतोषाचा उद्रेक होता. चालक संघटनांनी केलेल्या सर्वेक्षणानुसार सरासरी चालकाची रोजची कमाई जेमतेम 800 ते 1000 रुपयांच्या घरात आहे. ही कमाई घर बनवणारे मिस्तरी तसेच लेबर यांची आहे. पण सर्वसामान्य दुकानावर काम करणाऱ्या व्यक्तीची कमाई. फक्त 322.ते.400रुपये रोज असून त्याला.12. तास काम करावे लागते सरासरी पगार. महिना.10000.ते.12000. रुपये आहे..

इंधनाचा भडकलेला दर सुमारे शंभर रुपये प्रति लिटर आणि वाहनाच्या देखभालीवर होणारा जवळपास.30%. टक्के खर्च वजा केला तर अनेक चालकांच्या हाती महिन्याला 15 ते 20. हजार रुपयांपेक्षा जास्त काहीच उरत नाही. फेअरवर्क इंडिया या संस्थेने 2025 मध्ये दिलेल्या अहवालात उबर आणि ओला या दोन्ही कंपन्यांना न्याय वेतनाच्या निकर्षावर नापास म्हणजे एफ श्रेणी दिली होती. आणि 85% टक्के चालक रोज 10. तासांहून अधिक राबूनही जेमतेम कमाई करत असल्याचे नोंदवले होते. या उलट ओला कंपनीने स्वतः आर्थिक वर्ष 2024 मध्ये 4. हजार कोटी रुपयांचे कमिशन कमावल्याचे तिच्याच आर्थिक विवरणपत्रांत नमूद आहे. तर उबर इंडियाने 2024 मध्ये दोन अब्ज डॉलरची उलाढाल केली. म्हणजे भांडवल गुंतवणाऱ्या कंपन्यांचे उखळ पांढरे होत असताना रस्त्यावर राबणाऱ्या चालकाच्या ताटात मात्र उपासमारीचे तुकडे उरतात. निती आयोगाच्या 2022 च्या अंदाजानुसार देशातील गिग अर्थव्यवस्थेत सुमारे.80. लाख कामगार आहेत आणि.2030. पर्यंत ही संख्या अडीच कोटीवर जाण्याचा अंदाज आहे. याचाच अर्थ उद्याच्या भारतातील बेरोजगार पदवीधरांचा मोठा वाटा मग तो अभियंता असो. वाणिज्य पदवीधर असो वा कला शाखेचा विद्यार्थी याच असुरक्षित कुठलेही सामाजिक संरक्षण नसलेल्या कामात ढकलला जाणार आहे. यापुढे सुशीक्षित बेरोजगाराचे जीवन अंधकारमय होणार असल्या सारखे चित्र स्पष्ट दिसत आहे सुशिक्षित बेरोजगारां पुढे मोठे आव्हान उभे राहिले आहे त्यांची अवस्था बिकट झाली असून इकडे आड आणि तिकडे विहीर अशी परिस्थिती सुशिक्षित बेरोजगारांना समोर निर्माण झाली आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# रानडुकरांचा सुळसुळाट;उभ्या मक्याचे पीक केले भुईसपाट !

## आमसरी शिवारातील गट क्र. 74 मधील घटना; शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान, पंचनामा करून नुकसानभरपाई देण्याची मागणी !

**अजिंठा प्रतिनिधी :** सिल्लोड तालुक्यातील आमसरी शिवारात रानडुकरांच्या कळपाने धुमाकूळ घालत उभ्या असलेल्या मक्याच्या पिकात शुक्रवारी (दि. २१ ) रात्री घुसून रानडुकरानी जमीनदोस करून

पिक नुकसान केल्याचा प्रकार उघडीस आले आहे.

अमसरी येथील शेतकरी काशिनाथ एकनाथ दांडगे यांच्या (गट क्र. ७४ ) मधील मक्याच्या शेतात

रानडुक्कर रात्रीच्या वेळी कळपांनी शेतात शिरून पिके उद्ध्वस्त केल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. दिवसभर शेतात मेहनत करूनही रात्री पिकांच्या संरक्षणासाठी जागरण करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. उभी पिके डोळ्यादेखत नष्ट होत आहेत.

पावसाच्या अनिश्चिततेमुळे खरीप हंगामातील पिकांची चिंता असतानाच वन्यप्राण्यांच्या उपद्रवामुळे शेतकऱ्यांसमोर आणखी एक संकट उभे राहिले आहे. रात्रीच्या वेळी रानडुकरांचा कळप शेतात शिरला. त्यांनी मक्याचे पीक तुडवत आणि आडवे पाडत मोठ्या प्रमाणात नुकसान केले. सकाळी शेतात गेल्यानंतर पिकाची झालेली अवस्था पाहून दांडगे यांना धक्का बसला.

मका पिकासाठी बियाणे, खते, मशागत आणि मजुरीवर खर्च करण्यात आला होता. रानडुकरांच्या नासधुशीमुळे हा खर्च वाया जाण्याची शक्यता असून, उत्पादनावरही परिणाम होणार आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने पाहणी करून नुकसानीचा पंचनामा करावा, अशी मागणी शेतकऱ्याने केली आहे.

जंगलालगतच्या शेतकऱ्यांची चिंता वाढली

सिल्लोड तालुक्यातील जंगलालगतच्या अनेक शेतजमिनींमध्ये रानडुकरांसह अन्य वन्यप्राण्यांकडून पिकांचे नुकसान होत असल्याच्या तक्रारी शेतकरी करीत आहेत. रात्रीच्या वेळी रानडुकरांचे कळप शेतात घुसत असल्याने पिकांचे संरक्षण करणे कठीण होत आहे. पिकांचे



नुकसानीत मोठा आर्थिक फटका बसला आहे . वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करण्यासाठी वनविभागाने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

**तातडीने पंचनामा करण्याची मागणी :** आमसरी शिवारातील नुकसानीची प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामा करावा आणि शासनाच्या नियमानुसार नुकसानभरपाई मंजूर करावी, अशी मागणी काशिनाथ दांडगे यांनी केली आहे. भविष्यात रानडुकरांपासून पिकांचे संरक्षण होण्यासाठी वनविभागाने कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

**दुहेरी संकटात शेतकरी :** पावसाच्या खंडामुळे खरीप पिकांच्या उत्पादनाची चिंता असतानाच रानडुकरांकडून पिकांची नासधूस होत असल्याने शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च धोक्यात आला आहे. वनविभागाने तातडीने पाहणी करून नुकसानभरपाईची कार्यवाही करावी आणि वन्यप्राण्यांचा शेतातील उपद्रव रोखण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

# फर्दापूर जि.प. गटातील विकासकामांचा शुभारंभ; भाजपा कार्यालयाचे उद्घाटन



**सावळदबारा प्रतिनिधी :** फर्दापूर जिल्हा परिषद गटातील विविध विकासकामांचा शुभारंभ तसेच भारतीय जनता पार्टीचे कार्यालयाचा उद्घाटन पार पडला. फर्दापूर येथे झालेल्या या कार्यक्रमास कॅबिनेट मंत्री अतुल सावे व माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्या हस्ते विविध विकासकामांचा शुभारंभ व भाजपा कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी आमदार सुहास सिरसाठ, भाजपचे अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी यांची प्रमुख उपस्थिती होती. भाजपचे प्रदेश चिटणीस सुरेश पाटील बनकर, माजी आमदार सांडू पाटील लोखंडे, जिल्हा परिषद उपाध्यक्ष जितेंद्र जैस्वाल, जिल्हा सरचिटणीस ज्ञानेश्वर पाटील मोठे, सुनील पाटील मिरकर, जिल्हा परिषद सदस्य पुष्पाताई काळे, जिल्हा परिषद सदस्य माहिन इद्रिस मुलतानी, जिल्हा चिटणीस सुनील गावंडे, तालुका अध्यक्ष संजय पाटील, भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते, सभापती उत्तम चव्हाण,गजानन पवार, एकनाथ सपाटे, दिनकर शिपलकर, आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

फर्दापूर गटातील विविध विकास कामाचे उद्घाटन फर्दापूर येथे करण्यात आले. भाजपचे अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी, जिल्हा परिषद सदस्य माहीन इद्रिस मुलतानी यांनी या कामाचा पाठपुरावा केला होता आणि उद्घाटन करण्यात आले.

# बीएड् छात्र सेवाकाल सोहळ्याचा शुभारंभ



**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** शासकीय अध्यापक महाविद्यालयातील बी. एड. द्वितीय वर्षाच्या प्रशिक्षणार्थ्यांचा छात्र सेवाकाल शासकीय विद्या निकेतनमध्ये सुरू झाला. छात्र सेवाकालाचा उद्घाटन सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्ष व उद्घाटक शासकीय विद्या निकेतनच्या प्राचार्य डॉ. सुनीता राठोड होत्या. त्यांनी छात्र अध्यापकांना गुणवत्तापूर्ण पद्धतीने शैक्षणिक कार्य करण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. नलिनी चोंडेकर यांनी प्रशिक्षणार्थ्यांना छात्र सेवाकालाच्या यशस्वीतेसाठी मार्गदर्शन केले. छात्रसेवाकाल मार्गदर्शक डॉ.पद्मा जाधव, शिक्षक चरपेलवार आणि मेंटॉर शिक्षक माया सोनवणे आणि छात्र अध्यापक चिन्मय कुलकर्णी यांची देखील समयोचित भाषणे झाली. प्रास्ताविक छात्रमुख्याध्यापक संध्या हिंगोले यांनी, तर छात्र उपमुख्याध्यापक अरबाज शेख यांनी आभार मानले. सूत्रसंचालन साधना जोशी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ऋषिकेश गावंडे, सूर्यकांत मुळीक, गालिब पठाण, पूजा डोईफोडे, संजना ससेमहाल, हर्षा दानकर, वर्षा मोरे या प्रशिक्षणार्थ्यांनी प्रयत्न केले.





जिंतूर - पिंपळगाव काजळे ते श्रीक्षेत्र औंढा नागनाथ येथे कावड यात्रेत जाणाऱ्या भक्तांचे जिंतूर येथे जोरदार स्वागत केले. त्या वेळी वाहतुकीस व भक्तांना कुठंही त्रास होऊ नये यासाठी पोलिस बंदोबस्त दिसत आहे. (छाया - सचिन रायापत्रीवार)

# रानडुकरांच्या उच्छादामुळे शेतकरी त्रस्त बंदोबस्त करण्याची वनविभागाकडे मागणी

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी



**सोयगाव,दि.२४ ऑगस्ट :** सोयगाव शेतीशिवारात रानडुकरांनी उच्छाद माजवला आहे. कपाशी,मक्का,भुईमूग,उडीद,मुंग,चवळी पिकांचे अतोनात नुकसान रानडुकरांनी केले आहे.आतापर्यंत डोंगर क्षेत्राला लागून असलेल्या शिवारात असणारे रानडुकरांनी गावालगतच्या शेतात आपला मोर्चा वळवीला असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे याचा बंदोबस्त करण्याची मागणी शेतकऱ्यांनी वनविभागाकडे केली आहे.

सोयगाव तालुक्यात असलेल्या डोंगर रांगेत अनेक जंगली प्राण्यांचे वास्तव्य आहे.त्यामुळे डोंगर क्षेत्राला लागून असलेल्या शेतशिवारात रानडुकर,रोही,हरीण आदी प्राण्यांकडून नुकसान होते. परंतु आता हे प्राणी आता गावा लगत असलेल्या शेत शिवारात दिसून येत आहे.कळापा कळपा ने शेतात घुसून नुकसान करणाऱ्या उपद्रवी प्राण्यांच्या उच्छादामुळे शेतकरी त्रस्त झाले आहे.मक्का, कपाशी,भुईमूग,उडीद,मुंग,चवळी आदी पिकांवर ताव मारण्यासाठी हे पिकं उपटून फेकत आहे.त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे.अशा उपद्रवी प्राण्यांचा बंदोबस्त करण्यात यावा व झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून भरपाई देण्याच्या मागणीचे निवेदन नगरसेवक संतोष बोडखे,राजू दुतोंडे,संदीप चौधरी,भारत तायडे,अरुण वाघ,पूनम परदेशी आदीनी वनपरीक्षेत्र कार्यालयात दिले आहे.

# ननपाच्या 17 माध्यमिक शाळांमधील नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांना नवीन पाठ्यपुस्तकांचे वितरण संपन्न

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांमधील इयत्ता नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी एक अत्यंत दिलासादायक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. महानगरपालिकेच्या स्वतंत्र निधीतून इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी पाठ्यपुस्तकांची व्यवस्था करण्यात आली असून, जशी बालभारतीकडून पुस्तके उपलब्ध झाली, तशी ती तातडीने मनपाच्या सर्व १७ माध्यमिक शाळांना वितरित करण्यात आली आहेत. यामुळे आता विद्यार्थ्यांच्या हाती नवीन पुस्तके



पडली असून त्यांच्या शैक्षणिक प्रवासाला अधिक गती मिळणार आहे.

सामान्यतः महानगरपालिकेच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शासन स्तरावरून पाठ्यपुस्तकांचा मोफत पुरवठा केला जातो. मात्र, इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी महानगरपालिकेच्या निधीतून पुस्तके उपलब्ध करून दिली जातात. चालू शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीच्या काळात इयत्ता नववी व दहावीची नवीन पाठ्यपुस्तके बालभारतीकडे उपलब्ध नव्हती. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या शिक्षणात कोणताही खंड किंवा अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी मनपा प्रशासनाने अत्यंत दूरदृष्टीने पावले उचलली. शाळा सुरू होण्याच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना गतवर्षीची पाठ्यपुस्तके उपलब्ध करून देण्यात आली. त्यामुळे शाळा सुरू झाल्यानंतर एकाही विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान झाले नाही आणि वेळेत अध्यापन कार्य सुरू झाले.

मनपाच्या अखत्यारीतील सर्व १७ माध्यमिक शाळांकडे रवाना करण्यात आली. शाळांपर्यंत पुस्तके पोहोच झाल्यानंतर त्वरित ती विद्यार्थ्यांच्या हातात सुपूर्द करण्यात आली आहेत. नवीन कोरी पुस्तके मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांमध्येही आनंदाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

# तण नियंत्रण, आच्छादनाचा वापराने वाढवा मातीतील ओलावा आणि पिके वाचवा : वनामकृविच्या शास्त्रज्ञांचा सल्ला

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :**-ऑगस्ट महिन्यात महाराष्ट्रात पावसात मोठा खंड पडला आहे. विविध हवामान संस्थांच्या अंदाजानुसार आगामी काळात जोरदार पावसाची शक्यताही कमी आहे. खरिपातील प्रमुख पिके सध्या वाढीच्या संवेदनशील अवस्थेत आहेत. त्याचवेळी नेमका पावसाचा खंड पडल्याने, पिकांची काळजी घेणे अत्यावश्यक आहे. पावसाच्या खंड काळात नेमकी काय काळजी घ्यावी याबाबत परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि आणि संशोधन संचालक डॉ. भगवान आसेवार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेले अखिल भारतीय कोरडवाहू प्रकल्पाचे प्रभारी अधिकारी डॉ. आनंद गोरे यांनी सांगितले की, सध्याच्या परिस्थितीत पिकांची अवस्था, जमिनीतील ओलावा लक्षात घ्यावा, उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर करा आणि प्रत्येक पावसाच्या थेंबाचे संधारण करा या तत्त्वावर पुढील पीक व्यवस्थापन करणे आवश्यक आहे.

१) शेतातील परिस्थितीचे परीक्षण करा

सर्व शेतांमध्ये एकसारखे व्यवस्थापन करणे योग्य नाही. प्रत्येक शेतातील जमिनीचा प्रकार, उपलब्ध ओलावा, पिकाची अवस्था, पिकाची वाढ, पाण्याची उपलब्धता आणि पुढील हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन निर्णय घ्यावा. शेतातील माती हातात घेऊन तिच्यामध्ये पुरेसा ओलावा आहे का हे तपासावे. पिकाची पाने सकाळच्या वेळी तजेलदार आहेत का, दुपारच्या वेळी पाने वाकतात का, पाने गुंडाळली जात आहेत का, वाढ मंदावली आहे का, फुलगळ होत आहे का, याचे निरीक्षण करा. त्यानुसार पिकांना संरक्षित सिंचन देण्याचा निर्णय घ्या.

२) संरक्षित सिंचन काटेकोरपणे वापरा

ज्या शेतकऱ्यांकडे विहीर, बोअरवेल, शेततळे, कालवा किंवा अन्य सिंचनाची सुविधा उपलब्ध आहे, त्यांनी उपलब्ध पाण्याचा संरक्षित सिंचनासाठी वापर करावा. पाण्याचा जास्त ताण बसलेल्या पिंकांसाठी, त्यांच्या संवेदनशील अवस्थेत संरक्षित सिंचनाचा वापर करा. सिंचनासाठी शक्यतो, ठिबक किंवा तुषार सिंचनाचा वापर करा.

३) पावसाच्या प्रत्येक थेंबाचे जलसंधारण करा

जो काही पाऊस पडेल त्या पावसाचे पाणी शेतात मुरविणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यासाठी शेताच्या उतारानुसार जलसंधारणाच्या सऱ्या काढाव्यात, पुढील नियोजनासाठी शक्य तिथे कंपार्टमेंट बंडिंग, समतल बांध बंधिस्ती, सध्या शेततळ्यांचा आणि त्यातील पाण्याचा कार्यक्षम वापर, नाला बांध व लघु जलसंधारण येथील पाण्याचा योग्य वापर, पावसाचे पाणी शेताबाहेर वेगाने वाहून जाणार नाही याची काळजी घेणे, शेताच्या उतारानुसार योग्य ठिकाणी पाणी अडविण्याची व्यवस्था करावी. पाणी अडवा, पाणी जिरवा आणि उपलब्ध ओलावा पिकाच्या मुळांपर्यंत टिकवून ठेवा. या सूत्रानुसार शक्य ते व्यवस्थापन करावे. सर्वात सोपे आणि कमी खर्चाचे तंत्रज्ञान म्हणजे कपाशी, तूर सारख्या अधिक अंतरावरील पिकांत एक ते दोन ओळीनंतर जल संधारण सरी काढावी.

४) तण नियंत्रणाला प्राधान्य

कमी पावसाच्या सध्याच्या परिस्थितीत तण हे पिकांशी पाणी,अन्नद्रव्ये, सूर्यप्रकाश व जागेसाठी स्पर्धा करतात. त्यामुळे तण नियंत्रण अत्यंत आवश्यक आहे. विशेषतः पावसाच्या खंड काळात तण नियंत्रण केल्यास मातीतील उपलब्ध ओलावा मुख्य पिकासाठी उपयुक्त ठरतो. सध्या पिकांची अवस्था पाहून खुरपणी आणि कोळपणी करावी. पीक फुलावर असल्यास कोळपणी टाळावी. शक्य तिथे उपट तण करावे. मजूर उपलब्ध नसल्यास संबंधित पिकासाठी शिफारशीत उगवणपश्चात तणनाशकाचा वापर करावा. पिकांची आणि तणांची योग्य अवस्था, तणनाशकाची फवारणी करताना एकरी योग्य मात्रा, योग्य वेळ आणि योग्य पद्धत वापरावी आणि यासाठी पाण्याचा योग्य प्रमाणात वापर करावा. जमिनीत ओल असावी. मात्र पिकावर ताण असताना किंवा पाऊस/सिंचनानंतर अति ओलाव्याच्या स्थितीत तणनाशकाची फवारणी करण्यापूर्वी स्थानिक शिफारशींचे पालन करावे. आता तण नाशक वापरण्याची वेळ अनेक पिकात निघून गेली आहे. हळद, ऊस किंवा फळ पिकात वापर करता येईल. शिफारशी नुसारच तणनाशकांचा वापर करावा.

# आज शेंद्रा येथे पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा; १ हजार २८९ रिक्त पदांसाठी संधी

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि एमआयडीसी कौशल्य विकास केंद्र, शेंद्रा यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, २५ ऑगस्ट रोजी एका भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा सकाळी साडेसात वाजता एमआयडीसी कौशल्य विकास केंद्र, शेंद्रा येथे होणार असल्याची माहिती जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त सुरेश बहुरे यांनी दिली आहे.

छत्रपती संभाजीनगर तसेच पुणे येथील नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधी मेळाव्यास उपस्थित राहून उमेदवारांच्या थेट मुलाखती घेणार आहेत. या मेळाव्यात एकूण १७ नामांकित आस्थापनांकडून १ हजार २८९ रिक्त पदांसाठी प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात येणार आहेत. यामध्ये एनव्हिरो डेव्हलपमेंट सोल्यूशन, चंद्रिकला इंजिनिअरिंग प्रा. लि., रुचा इंजिनिअरिंग, बजाज इलेक्ट्रिकल्स, इंसेफ सर्व्हिसेस प्रा. लि., फोर्ब्स प्रिसिजन टूल्स प्रा. लि., बी. जी. इलेक्ट्रिकल्स अँड इलेक्ट्रॉनिक्स, डिस्टील एज्युकेशन अँड टेक्नॉलॉजी प्रा. लि., नेक्सलिड कन्सल्टिंग एलएलपी, लेबरनेट इंडिया सर्व्हिसेस प्रा. लि., बजाज ऑटो लि., परकिन्स इंडिया प्रा. लि., भारत फोर्ज लि. (पुणे), व्हॅलिओ इंडिया प्रा. लि. (पुणे), एम. जी. कॉर्पोरेशन, स्टरलाइट टेक्नॉलॉजी लि. आणि नायडेक ग्लोबल अप्लायन्स या कंपन्यांचा समावेश आहे. या पदांसाठी कोणत्याही शाखेची पदवी, अभियांत्रिकी पदवी, पदविका, आयटीआय, बारावी तसेच दहावी उत्तीर्ण अशा विविध शैक्षणिक पात्रताधारक युवक-युवतींना त्यांच्या पात्रतेनुसार रोजगाराची सुवर्णसंधी उपलब्ध होणार आहे.

मेळाव्यात सहभागी होण्यासाठी रोजगार नोंदणी असलेल्या उमेदवारांनी 'महास्वयं रोजगार''च्या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन युजर आयडी व पासवर्डच्या माध्यमातून लॉग इन करून ऑनलाईन अर्ज करणे अनिवार्य आहे. याशिवाय, उमेदवारांनी आपल्या बायोडाटाच्या १५ प्रती सोबत घेऊन प्रत्यक्ष मेळाव्याच्या ठिकाणी उपस्थित राहून मुलाखतीमध्ये सहभाग घ्यावा. संकेतस्थळावर नोंदणी करताना किंवा रिक्त पदांसाठी अर्ज करताना काही अडचण आल्यास ०२४०-२९५४८५९ या दूरध्वनी क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधता येईल. जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवक-युवतींनी या उपलब्ध संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# उच्च शिक्षणासाठी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले व पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयंम योजनेचे ऑनलाईन अर्ज सुरु

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील (इमाव, विमाप्र, विजा, भज) उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचे दरवाजे खुले झाले आहेत. या अंतर्गत 'ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना' आणि 'पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयंम योजना' साठी सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरिता ऑनलाईन प्रवेश अर्ज प्रक्रिया जाहीर करण्यात आली आहे. इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक दयानंद कोकरे यांनी पात्र विद्यार्थ्यांना अर्ज करण्याचे आवाहन केले आहे.

ही ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती (भज-क प्रवर्ग वगळून) आणि विशेष मागास प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांसाठी लागू आहे, तर पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयंम योजना ही केवळ भज-क प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांसाठी आहे.व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या योजनांचा लाभ दिला जातो. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांमध्ये प्रथम वर्ष किंवा थेट द्वितीय वर्षात प्रवेश घेऊन नियमित शिक्षण घेत असलेल्या पात्र विद्यार्थ्यांनी या सुविधेचा लाभ घेणे आवश्यक आहे. या योजनांसाठी १२ ऑगस्ट २०२६ पासून ऑनलाईन अर्ज करण्याचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. पात्र विद्यार्थ्यांनी महाआइट पोर्टलच्या (**https:**//hmasnew.mahait.org) अधिकृत संकेतस्थळा वरून परिपूर्ण अर्ज ऑनलाईन सादर करावा.

# अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी महाडीबीटी 2.0 अर्ज प्रक्रिया सुरू; नवीन ‘महाआयडी’ अनिवार्य

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्ती योजनांचे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रिया 'महाडीबीटी २.०' या नवीन प्रणालीवर सुरू करण्यात आली आहे. या प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांचा नवीन 'महाआयडी' करणे अनिवार्य करण्यात आले असून, कोणत्याही परिस्थितीत पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज प्रलंबित ठेवू नयेत, असे निर्देश संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांना देण्यात आले आहेत, अशी माहिती सहायक आयुक्त डॉ. अनिता राठोड यांनी दिली आहे.

महाडीबीटी २.० पोर्टलवर नोंदणी करण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांना नवीन महाआयडी तयार करणे बंधनकारक आहे. यासाठी मागील पोर्टलवरील युझर आयडी किंवा पासवर्डची आवश्यकता राहणार नाही. विद्यार्थ्यांनी क्रमांकाच्या आधारे नवीन महाआयडी तयार करावा आणि त्यासोबतचा पत्ता, मोबाईल क्रमांक, ई-मेल तसेच बँक खात्याची माहिती अचूक व अद्ययावत असल्याची खात्री करावी.


अर्ज करताना जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, अधिवास प्रमाणपत्र, शैक्षणिक गुणपत्रके तसेच योजनेसाठी आवश्यक अन्य कागदपत्रे स्पष्ट पीडीएफ स्वरूपात अपलोड करावीत. नवीन तसेच नूतनीकरण अशा दोन्ही प्रकारच्या अर्जांसाठी नवीन महाआयडी आवश्यक आहे. नूतनीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांनी लॉगिन केल्यानंतर ‘माझा अर्ज नूतनीकरण करावा’ हा पर्याय निवडावा. भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत संबंधित महाविद्यालयाकडून शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस शिक्षण शुल्क घेतले जात नसल्याने, शासनाचा हिस्सा विद्यार्थ्यांच्या खात्यात प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी शुल्क महाविद्यालयास अदा करावे.

महाडीबीटी २.० प्रणालीमध्ये महाविद्यालयासाठी आता केवळ प्राचार्यांचे एकच लॉगिन उपलब्ध राहणार असून, लिपिक लॉगिन बंद करण्यात आले आहे. महाविद्यालयांनी पोर्टलवरील आपले प्रोफाइल तपासून अभ्यासक्रमनिहाय निश्चित करण्यात आलेली शुल्क रचना तातडीने अद्ययावत करावी. पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज विहित मुदतीत मंजूर करून पुढे पाठविण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित प्राचार्यांची राहणार आहे.

विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी. पोर्टलवरील लॉगिन टॅबमध्ये ‘नागरिकांसाठी लॉगिन’ किंवा ‘महाआयडीशिवाय प्रवेश करा’ या पर्यायाचा वापर करून लॉगिन करता येईल. क्रमांकाशी संलग्न मोबाईल क्रमांकावर प्राप्त होणाऱ्या ओटीपीद्वारे लॉगिन प्रक्रिया पूर्ण करावी.

अनुसूचित जाती प्रवर्गातील कोणत्याही पात्र विद्यार्थ्याकडून प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची रक्कम घेतली जाऊ नये, अशा सक्त सूचना देण्यात आल्या आहेत. महाडीबीटी २.० संदर्भातील अधिक माहितीसाठी ०२२-४९१५०८०० किंवा १८००१०२५३११ या क्रमांकावर अथवा helpdesk@mahadbt.gov.in या ई-मेलवर संपर्क साधता येईल. तांत्रिक अडचणींसाठी लॉगिनमधून ऑनलाइन तक्रार नोंदविण्याची सुविधाही उपलब्ध आहे.

# सुहास सदाफळ यांना पीएचडी प्रदान



**छत्रपती संभाजीनगर, दि.२४ :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या फॅकल्टी ऑफ बेसिक अँड अप्लाईड सायन्सच्या रसायनशास्त्र विषयातील संशोधक सुहास सदाफळ यांना ‘सिन्थेसिस ऑफ हेटेरोॲटम कंटेनिंग कम्पाउंड्स यूजिंग बेनाइन कॅटॅलिटिक मेथडॉलॉजी’ या विषयावर पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांना एमजीएम विद्यापीठाच्या प्राध्यापिका डॉ.जयश्री गवई यांनी मार्गदर्शक आणि विभागप्रमुख डॉ.एस.बी.सपकाळ यांनी सहमार्गदर्शन म्हणून मार्गदर्शन केले आहे. सुहास सदाफळ यांच्या यशाबद्दल कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, परीक्षा नियंत्रक डॉ.एच.एच.शिंदे, अधिष्ठाता डॉ.प्राप्ती देशमुख, एमेरिटस प्राध्यापक डॉ.के.एम.जाधव, प्राचार्या डॉ.विजया मुसांडे, सर्व संबंधित प्राध्यापक व सहकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# सीजीकडून एएमएक्स सिरीज ड्राइव्ह्ज लाँच

मुंबई:सीजी पॉवर अँड इंडस्ट्रियल सोल्युशन्स लिमिटेड (सीजी) या जागतिक इंजिनिअरिंग कंपनी आणि इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग क्षेत्रातील अग्रगण्य कंपनीने एएमएक्स सिरीज ड्राइव्ह्जच्या लाँचची घोषणा केली आहे. जनरल पर्पज एसी ड्राइव्ह्जची ही नवीन रेंज कंपनीच्या इंडस्ट्रियल ड्राइव्ह्ज आणि ऑटोमेशन सोल्युशन्सच्या पोर्टफोलिओचा अधिक विस्तार करते.

# खुलताबादमध्ये एकदिवसीय राष्ट्रीय परिसंवादाचे दिमाखदार आयोजन

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

छत्रपती संभाजी नगर जिल्हा प्रतिनिधी कुतुबुल वासिलीन शेख-उल-इस्लाम हजरत ख्वाजा शेख मुन्तजबोद्दीन जर जरी जर बक्ष दुल्हा रहमतुल्लाह अलैह यांच्या ७४० व्या उरूसानिमित्त खानकाह-ए-दरगाह हजरत ख्वाजा शेख बुरहानुद्दीन गरीब रहमतुल्लाह अलैह येथे 'सूफियाये खुलताबाद - विद्वत्ता, दावत आणि अध्यात्म' या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय परिसंवाद उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी खानकाह हजरत शेख आलम रदौली शरीफचे सज्जादानशीन तथा उलमा व मशायख बोर्डचे उपाध्यक्ष हजरत शाह अम्मार अहमद अहमदी नीर मियाँ किबला होते. प्रसिद्ध निवेदक साबीर मुस्तफाबादी यांनी सूत्रसंचालन केले.



परिसंवादात देशभरातील नामवंत अभ्यासक, विद्वान, उलमा व मशायख यांनी सहभाग घेतला. यावेळी सूफियाये खुलताबाद यांच्या शैक्षणिक, साहित्यिक, धार्मिक आणि आध्यात्मिक कार्यावर विविध मान्यवरांनी अभ्यासपूर्ण विचार मांडले. सय्यद हिलाल मुहिबी रज्जाकी यांनी 'औलियांच्या शिकवणीत कुरआन व सुन्नतचे महत्त्व', डॉ. अता उर्रहमान नूरी यांनी 'खुलताबादचा शैक्षणिक व साहित्यिक वारसा', ॲड. सय्यद महबूब निजामी यांनी 'वर्तमान काळातील आव्हाने आणि खानकाहींची भूमिका', प्रा. शेख हसनोद्दीन यांनी 'वक्फ संस्थांचे व्यवस्थापन व संरक्षण', तर मोहम्मद सकलैनुद्दीन नजमुद्दीन यांनी 'हजरत ख्वाजा बुरहानुद्दीन गरीब यांचे शैक्षणिक व वैचारिक कार्य' या विषयांवर आपले विचार मांडले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी दरगाह समितीचे अध्यक्ष मोहम्मद एजाज अहमद सुलतान अहमद, परिसंवाद समितीचे संयोजक मोहम्मद सकलीनुद्दीन नजमुद्दीन, सहसंयोजक माजिद मोहम्मद नूर मोहम्मद तसेच हद्द कलाँ येथील दरगाह समितीचे पदाधिकारी व सेवेकऱ्यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.

यावेळी हद्द कलाँ दरगाह समितीचे अध्यक्ष एजाज अहमद, सचिव मोहम्मद मतीन जागीरदार, उपाध्यक्ष इमरान जागीरदार, समिती सदस्य मुनीबुद्दीन, मुबश्शिरुद्दीन, सालेह मोहम्मद, हबीबुद्दीन, युसूफुद्दीन, कामरानुद्दीन, अबरारुद्दीन, हद्द खुर्द दरगाह कमिटीचे अध्यक्ष शरफोद्दीन रमजानी, शाह जलालुद्दीन गंज रवाँ समितीचे अध्यक्ष नवाब कमरुद्दीन यांच्यासह छत्रपती संभाजीनगर व परिसरातील अनेक उलमा, मशायख आणि मान्यवर उपस्थित होते. तसेच अबू मोहम्मद, अयाजुद्दीन, शम्सुद्दीन, अन्वरुल्लाह, अब्दुल हमीद, मोहम्मद अनजर, मोहम्मद साईम, जिशान बुरहानी, रियाजुद्दीन, हाफिज कुद्दूस, गुलजार अहमद, नोविद सर आदींचीही उपस्थिती होती.

समारोपप्रसंगी दरगाह समिती व उरूस व्यवस्थापन समितीचे सदस्य तथा परिसंवाद समितीचे अध्यक्ष ॲड. कैसरुद्दीन हाजी जहीरुद्दीन यांनी सर्व मान्यवर पाहुणे, उलमा, मशायख व उपस्थितांचे आभार मानले. औलियांच्या शिकवणीत शांतता, प्रेम, बंधुभाव आणि मानवतेचा शाश्वत संदेश आहे. हा वैचारिक व आध्यात्मिक वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे, असे त्यांनी सांगितले.

परिसंवादाचा समारोप औलियांच्या शिकवणीचे आचरण करण्याचा संकल्प तसेच देशात व समाजात शांतता, सलोखा, बंधुभाव आणि सुरक्षितता नांदावी, यासाठी विशेष प्रार्थनेने करण्यात आला.

# शहरात डेंग्यू, मलेरिया नियंत्रणासाठी मनपाची 'धडक गप्पी मासे मोहीम' यशस्वी

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

शहरात पावसाळ्यात वाढणाऱ्या डासांच्या उपद्रवावर आणि त्यामुळे होणाऱ्या आजारांवर प्रभावी आळा घालण्यासाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या आरोग्य मलेरिया विभागामार्फत शहरात 'धडक गप्पी मासे मोहीम' मोठ्या प्रमाणावर राबविण्यात आली. १९ ऑगस्ट ते २४ ऑगस्ट या कालावधीत राबविण्यात आलेल्या या विशेष मोहिमेदरम्यान शहरातील सर्व १० झोनमधील तब्बल ५१२ वेगवेगळ्या ठिकाणी गप्पी मासे सोडण्यात आले आहेत.

डेंग्यू, मलेरिया आणि चिकनगुनिया यांसारखे डासजन्य आजार रोखण्यासाठी रासायनिक कीटकनाशकांऐवजी पर्यावरणपूरक आणि जैविक पद्धतींचा वापर करण्यावर महानगरपालिकेने भर दिला आहे. गप्पी मासे हे पाण्यात वाढणाऱ्या डासांच्या अळ्या (लार्वा) मोठ्या प्रमाणावर फस्त करतात. यामुळे डासांच्या उत्पत्तीवर नैसर्गिकरीत्या आणि अत्यंत कमी खर्चात नियंत्रण मिळवता येते. याच उद्देशाला समोर ठेवून 'गप्पी मासे – जैविक डास नियंत्रणाचे प्रभावी अस्त्र' ही संकल्पना शहरात राबविण्यात आली.



मनपाच्या आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे की, केवळ प्रशासकीय पातळीवर प्रयत्न करून चालणार नाही, तर नागरिकांचे सहकार्यही तितकेच महत्त्वाचे आहे. नागरिकांनी आपल्या घराभोवती, गच्चीवर किंवा परिसरात टायर, कुंड्या, कुलर किंवा इतर वस्तूंमध्ये पाणी साचू देऊ नये. घरातील पाण्याच्या टाक्या व साठवणूक पात्रांची नियमित स्वच्छता करावी आणि डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी महानगरपालिकेच्या आरोग्य पथकाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

'डासांची उत्पत्ती रोखा – डेंग्यू व मलेरियाला आळा घाला' हा संदेश देत महानगरपालिका आणि नागरिकांच्या संयुक्त सहभागातून छत्रपती संभाजीनगर शहर डासमुक्त, निरोगी आणि सुरक्षित बनविण्याचा संकल्प करण्यात आला आहे. ज्या नागरिकांना आपल्या परिसरासाठी किंवा घरासमोरील पाण्याच्या साठ्यांसाठी गप्पी मासे हवे असतील, त्यांनी आपल्या जवळील मनपा आरोग्य केंद्रातील बहुउद्देशीय आरोग्य कर्मचाऱ्यांकडे आपले नाव, मोबाईल नंबर आणि पत्ता नोंदवावा, असे आवाहन आरोग्य विभागामार्फत करण्यात आले आहे.

# गौरक्षक सेना युवा मोर्चा परभणी जिल्हा कार्यकारणी सदस्य श्याम पठाडे यांची निवड

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी** :-मानवत तालुक्यातील ताड बोरगाव येथील संत विठोबा महाराज गोशाळा चे अध्यक्ष गोपालक शाम सदाशिव पठाडे यांची सनातन रक्षक सेना फाउंडेशन संचलित गौरक्षक सेना युवा मोर्चा परभणी जिल्हा मुख्य कार्यकारी सदस्य पदी नियुक्ती निवड करण्यात आली ही निवड गौरक्षक सेना संस्थापक अध्यक्ष अनुरमाताई सिंह यांच्या आदेशाने राष्ट्रीय अध्यक्ष सुनील भाई सेजाणी मार्गदर्शनाने गौरक्षक सेना मराठवाडा अध्यक्ष ह भ प ज्ञानेश्वर महाराज उखळीकर यांच्या पुढाकारातून मराठवाडा वरिष्ठ उपाध्यक्ष श्री श्री 1008 महामंडलेश्वर सचितानंद सरस्वती स्वामी अशोक महाराज पवार - मराठवाडा प्रचारक चंपालाल देवतवाल ठाकूर यांच्या सल्ल्यानुसार गौरक्षक सेना महाराष्ट्र प्रदेश संघटन मंत्री गोसेवक नितीन जाधव गोगलगावकर यांच्या शिफारशीनुसार ही निवड करण्यात आली

युवा मोर्चा कार्यकारणी सदस्य पदी श्याम पठाडे ही निवड झाल्याबद्दल व अभिनंदन स्वागत करण्यात येते प्रभारी जिल्हाध्यक्ष कृष्णा घुले त्याने सोशल मीडियाच्या माध्यमातून माहिती दिली अशी माहिती गौरक्षक सेना प्रदेश मंत्री तथा मराठवाडा संपर्कप्रमुख आणि परभणी जिल्हा निरीक्षक गोसेवक नितीन जाधव गोगलगावकर त्यांनी पत्रकार द्वारे माहिती दिली

# वॉक फॉर वॉटर'मधून महाराष्ट्रात जलसंधारणाची लोकचळवळ अधिक बळकट : मंत्री संजय राठोड

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी** : माती वाचवणे, पाणी जपणे आणि जलसंधारणाच्या कार्याला व्यापक लोकसहभागाची जोड देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या 'महा वॉकेथॉन – वॉक फॉर वॉटर'ला राज्यभर उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. राज्यातील ३६ जिल्ह्यांत एकाचवेळी झालेल्या या उपक्रमात तीन लाखांहून अधिक नागरिक सहभागी झाले. या सहभागातून जलसंधारणाचा संदेश महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचला, असे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी सांगितले.

जलसंधारण हा केवळ शासनाचा विषय नसून प्रत्येक नागरिकाच्या भवितव्याशी निगडित विषय आहे. त्यामुळे जलसंधारणाच्या कामांना लोकचळवळीचे स्वरूप देण्याच्या उद्देशाने 'वॉक फॉर वॉटर'चे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद हा महाराष्ट्रातील जनतेची जलसंधारणाबाबतची जागरूकता आणि सहभागाची भावना अधोरेखित करणारा आहे, असे मंत्री राठोड यांनी सांगितले.

प्रत्येक सहभागीने तीन किलोमीटर अंतर चालत जलसंधारणाचा संदेश दिला. तीन लाखांहून अधिक नागरिकांच्या सहभागातून हा सामूहिक प्रवास पूर्ण झाला. ही केवळ आकडेवारी नसून माती आणि पाणी संवर्धनासाठी महाराष्ट्राच्या जनतेने व्यक्त केलेली सामूहिक बांधिलकी आहे, असेही त्यांनी नमूद केले.

मुंबईतील वरळी येथे या उपक्रमाला सुरुवात झाली. त्याचवेळी राज्यातील ३६ जिल्ह्यांत नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. विद्यार्थी, युवक, महिला, शेतकरी, कर्मचारी, महाविद्यालयीन तरुणाई तसेच विविध सामाजिक घटकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विशेषतः युवकांचा सहभाग हा या उपक्रमाची महत्त्वाची जमेची बाजू ठरली.

राज्यात 'जलयुक्त शिवार अभियान २.०', 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार', 'अमृत सरोवर', प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना आदी विविध माध्यमांतून जलसंधारणाची कामे राबविण्यात येत आहेत.

# वेरूळ श्रावणाच्या दुसऱ्या सोमवारी घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग दर्शनासाठी हर हर महादेवाच्या गजरात मंदिर परिसर दणाणला

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

खुलताबाद प्रतिनिधी दि २३ वेरूळ श्रावण महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी आणि सलग सुट्ट्यांच्या पार्श्वभूमीवर वेरूळ येथील श्री घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगाच्या दर्शनासाठी लाखो भाविकांची अलोट गर्दी . रविवारी मध्यरात्रीपासून सुरू झालेली होती. रिमझिम पावसातही भाविकांनी 'हर हर महादेव', 'बम बम भोले'चा जयघोष करत घृष्णेश्वरा १२ वे ज्योतिर्लिंग चे दर्शन घेतले.



शुक्रवार .शनिवार, रविवार सलग सुट्ट्यांमुळे घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिरासह. वेरूळ लेणी पाहण्यासाठीही पर्यटकांची मोठी गर्दी झाली होती. मंदिरापासून जोडरस्त्यापर्यंत बॅरिकेड्स लावून दर्शनासाठी रांगेची व्यवस्था मंदिर प्रशासनाच्या वतीने करण्यात आली होती. येण्या-जाण्यासाठी स्वतंत्र मार्ग केल्याने भाविकांचे दर्शन सुरळीतपणे होत होते

मात्र, वाहन नियोजनामुळे अनेक भाविकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. भाविकांची वाहने पूर्वेकडे लेणी परिसरात, तर पश्चिमेकडे भोसले चौकाबाहेर एक ते दीड किलोमीटर अंतरावर थांबविण्यात आली. त्यामुळे वृद्ध महिला, वृद्ध पुरुष, लहान मुले तसेच बाहेरगावाहून आलेल्या भाविकांना पायी मंदिरापर्यंत जावे लागले.

गाभाऱ्यातील अभिषेक श्रावणच्या महिनाभर बंद

श्रावण महिन्याच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण श्रावण काळात मंदिराच्या गाभाऱ्यातील अभिषेक बंद ठेवण्या चा निर्णय मंदिर प्रशासनाने घेतला आहे . त्यामुळे भाविकांना बाहेरूनच दर्शन घेण्याची व्यवस्था करण्यात आली.

महत्त्वाचे निर्णय महाराष्ट्र सिक्युरिटी फोर्समुळे दलालांना चाप

मंदिर परिसरात महाराष्ट्र सिक्युरिटी फोर्सच्या जवानांची नियुक्ती करण्यात आल्याने सुरक्षाव्यवस्थेला बळ मिळाले आहे. कडक बंदोबस्तामुळे अवैध पद्धतीने दर्शन घडवून देण्याचा प्रयत्न करणाऱ्या दलालांना चाप बसल्याचे दिसून आले. भाविकांना सुलभ व पारदर्शक दर्शन मिळण्यासाठी ही व्यवस्था कायम ठेवण्यात यावी अशी मागणी भाविकांच्या वतीने घृष्णेश्वर मंदिर संस्थानचे अध्यक्ष कुणाल दांडगे यांच्याकडे केली आहे

भाविकांच्या सुरक्षेसाठी मंदिर परिसरात सीसीटीव्ही, छुपे कॅमेरे, खासगी सुरक्षारक्षक तसेच पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. त्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी खुलताबाद पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांच्या नियोजनाखाली चोक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता

# राजकुंवर महाविद्यालयात डॉ. बा. आं.म. विद्यापीठाचा 68 वा वर्धापन दिन उत्साहात

## विद्यार्थ्यांच्या कलागुणांना आणि सर्जनशीलतेला वाव; प्रेरणादायी भित्तीपत्रकांचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन

**फर्दापूर** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६८ वा वर्धापन दिन धनवट-फर्दापूर येथील राजकुंवर महाविद्यालयात अत्यंत उत्साहपूर्ण आणि चैतन्यमय वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यापीठाच्या गौरवशाली इतिहासाला उजाळा देत विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करण्यात आले

विद्यापीठाच्या योगदानाला उजाळा



या विशेष कार्यक्रमात उपस्थित मान्यवर आणि प्राध्यापकांनी विद्यापीठाच्या आजवरच्या ६८ वर्षांच्या देदीप्यमान वाटचालीचे स्मरण केले डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने आतापर्यंत दिलेले मोठे शैक्षणिक सामाजिक आणि सांस्कृतिक योगदान किती मोलाचे आहे याबद्दल विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले

या वर्धापन दिनाचे प्रमुख आकर्षण ठरले ते विद्यार्थ्यांनी तयार केलेली भित्तीपत्रके या मंगल पर्वाचे औचित्य साधून महाविद्यालयात भित्तीपत्रकांचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले

विद्यार्थ्यांनी विविध शैक्षणिक सामाजिक आणि प्रेरणादायी विषयांवर अत्यंत आकर्षक आणि माहितीपूर्ण भित्तीपत्रके तयार केली होती

या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या कलागुणांना विचारशक्तीला आणि सर्जनशीलतेला एक उत्तम व्यासपीठ मिळाले

या शानदार कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते सर्वांच्या विशेषत विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे आणि उत्साहामुळे वर्धापन दिनाचा हा सोहळा खऱ्या अर्थाने संस्मरणीय ठरला

# डिजिटल अरेस्ट माध्यमातून 11 लाखाची फसवणूक, कोतवाली पोलिसात गुन्हा दाखल; सेवानिवृत्त वरिष्ठ लिपिक फसविले

हिंदू प्रकाश वार्ता : प्रतिनिधी

**परभणी** :- परभणी शहरात गेल्या अनेक दिवसापासून सायबर भामट्याकडून मोबाईल द्वारे फसवणुकीचे अनेक प्रकार उघडकीस येत असून यामध्ये फसवले जाणारे सर्वजण सुशिक्षित असून रिझर्व बँक ऑफ इंडिया वारंवार सूचना देत असून भूलथापांना बळी पडून याच महिन्यामध्ये सेवानिवृत्त प्राध्यापकाला कोट्यावधी रुपयाला सायबर ॲरिस्टर ची भीती दाखवून फसविले होते त्या गुन्ह्याची उकल होते ना होतेच लगेच दुसरा गुन्हाही सायबर भामट्यांनी सेवानिवृत्त लिपिकाला चांगलेच गंडविले आहे त्यांना असे आमिष दाखवले की तुमच्या नावे असलेली बँक खात्यात दोन कोटी रुपये आले आहेत तुमच्या नावाचे एटीएम आरोपीकडे असून एटीएम दहा टक्के कमिशन वर दिलेले आहे असे म्हणत सेवानिवृत्त कर्मचाऱ्याला (वरिष्ठ लिपिक ) यांना डिजिटल अरेस्टाची भीती दाखवत अकरा लाख रुपये घेत त्यांची फसवणूक करण्यात आली आहे. याप्रकरणी सायबर भामट्यावर 2026 रविवार रोजी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गणेश पार पेली यांनी तक्रार दिली आहे फिर्यादी हे सेवानिवृत्त वरिष्ठ लिपिक असून त्यांना दिनांक 19 ऑगस्ट च्या सकाळी दोन अनोळखी मोबाईल क्रमांकावरून फोन आले संबंधित कुलाबा पोलीस स्टेशन मुंबई येथून बोलत असून तुमच्या मुंबई येथील बँकेच्या खात्यात या खात्यामध्ये दोन कोटी रुपये आलेले आहेत तुमच्या नावाचे एटीएम कार्ड ताब्यात असलेल्या आरोपी जवळ आढळले असून केलेल्या चौकशीत तुम्ही दहा टक्के कमिशनवर एटीएम कार्ड दिले असल्याचं चौकशीत निष्पन्न झाले असून असे सांगून तुमच्या खात्यामध्ये वीस लाख रुपये आलेले आहेत व तो सर्व पैसा काळा असून तुमच्या नावे डिजिटल अटॅक वॉरंट निघालेले आहे असे म्हणत अरेस्ट करण्याची भीती दाखवत फिर्यादीला आरटीजीएस द्वारे त्याच्या खात्यावर रक्कम टाकन्यास सांगितले.

# आ. कृ. वाघमारे प्रशालेत छात्र सेवाकालाचा उत्साहात शुभारंभ

**छत्रपती संभाजीनगर** : शासकीय अध्यापक महाविद्यालय, आय. ए. एस. ई., बी. एड. द्वितीय वर्ष, तृतीय सत्राच्या प्रशिक्षणार्थींच्या छात्र सेवाकालाचा आ. कृ. वाघमारे प्रशाला येथे उत्साहात शुभारंभ झाला. महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रा. डॉ. नलिनी चोंडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली छात्रसेवाकालाचे अडीच महिन्यांसाठी आयोजन करण्यात आले आहे. अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक डी. एम. हाके होते. व्ही. एस. कुलकर्णी या मेंटॉर टीचर म्हणून उपस्थित होत्या.



गटप्रमुख मार्गदर्शक प्रा. डॉ. वनिता रामटेके यांनी छात्रसेवाकालाचे महत्त्व विशद करताना प्रत्यक्ष अध्यापन अनुभव, शालेय संस्कार आणि शिक्षक म्हणून व्यक्तिमत्त्व विकासाचे महत्त्व अधोरेखित केले. प्रास्ताविक सीमा दिवेकर यांनी केले. सूत्रसंचालन अनुजा मुंढे यांनी केले. छात्र मनोगत व्यक्त करताना चंद्रकांत तायडे यांनी छात्रसेवाकाल हा भावी शिक्षक घडण्याचा महत्त्वपूर्ण टप्पा असल्याचे सांगितले. अध्यक्षीय समारोपात मुख्याध्यापक हाके यांनी प्रशिक्षणार्थींना शिस्त, विद्यार्थ्यांशी संवेदनशील संवाद आणि गुणवत्तापूर्ण अध्यापनाचा संदेश दिला. रामेश्वर विभुते यांनी सर्वांचे आभार मानले. यावेळी शाळेतील सर्व ज्येष्ठ शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आरती देवकते, स्वाती राऊत, प्रवीण साळवे, रोहित बनकर या सर्व प्रशिक्षणार्थींनी परिश्रम घेतले.

# उरणच्या अभय धनाजी ठाकूर यांची थायलंडमध्ये UWSFF जागतिक पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत दोन सुवर्णपदकांची कामगिरी

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

उरण रायगड

थायलंडमधील चियांग माई येथे आयोजित UWSFF जागतिक पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करत Taurus The Gym चे मालक अभय धनाजी ठाकूर यांनी उल्लेखनीय कामगिरी करत दोन सुवर्णपदके पटकावल्याचे त्यांनी भारताची शान उंचावली आहे. त्यांच्या या यशामुळे खोपटे गाव,उरण तालुक्यासह रायगडच्या क्रीडा क्षेत्रात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.विश्वविजेता अभय ठाकूर यांनी ७५ किलो वजन गटातील Bench Press प्रकारात २०० किलो वजन लिफ्ट उचलून भारतासाठी सुवर्णपदक मिळवले. तसेच Equipped Bench Press प्रकारातही सुवर्णपदकाची कमाई करत त्यांनी एकूण दोन सुवर्णपदकांचा मान मिळवला.









थायलंडच्या भूमीवर भारताचा तिरंगा अभिमानाने फडकवत आंतरराष्ट्रीय स्तरावर केलेली ही कामगिरी निश्चितच युवा खेळाडूंसाठी प्रेरणादायी ठरणारी आहे. कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण सराव, शिस्त आणि आत्मविश्वासाच्या जोरावर आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर देशाचे प्रतिनिधित्व करण्याचा मान अभय ठाकूर यांनी मिळवला आहे.

Taurus The Gym परिवारासाठी तसेच संपूर्ण भारतासाठी हा अभिमानाचा क्षण असून, त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल क्रीडाप्रेमी, प्रशिक्षक आणि नागरिकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धेत मिळवलेली ही दोन सुवर्णपदके उरणच्या क्रीडा क्षेत्रासाठी निश्चितच प्रेरणादायी ठेवा ठरणार असून, आगामी काळात अनेक युवा खेळाडूंना पॉवरलिफ्टिंगकडे वळण्यासाठी त्यातून नवी ऊर्जा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

भारताचा तिरंगा आंतरराष्ट्रीय स्तरावर उंचावणाऱ्या अभय धनाजी ठाकूर यांच्या या दमदार कामगिरी बद्दल सर्वच क्षेत्रातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या यशाचे श्रेय अभय ठाकूर यांनी त्यांचे नातेवाईक, मिस्टर इंडिया मिस्टर वर्ल्ड पदकाचे मानकरी प्रतिक दर्णे,इंडिया मिस्टर एशिया मिस्टर वर्ल्ड मिस्टर पदकाचे मानकरी भूषण पाटील,taurus जिम फॅमिली, मित्र परिवार यांना दिले आहे आहे.या सर्वांमुळेच हे यश गाठल्याचे अभय ठाकूर यांनी सांगितले.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911